शीलाचें मोल.

writer

लेखक

विठ्ठल कृष्ण नेरूरकर, बी. ए.

V. K. Nerur

प्रकाशक

बाळकृष्ण रावजी पालवणकर,

संपादक-खेळगडी.

किंमत १२ आणे.

प्रिंटर—
मंगेश नारायण कुलकर्णी,
कर्नाटक छापखाना,
४३४ ठाकुरद्वार, मुंबई.

प्रकाशक—
बाळकृष्ण रावजी पालवणकर
संपादक–खेळगडी.
मुगभाट ६७, गिरगांव–मुंबई.

पुस्तक उघडण्यापूर्वीं.

"**तुका ह्मणे नीत । न विचारितां नव्हे हित** "—तुकाराम.

"बायका, मुलें व शूद्र लोक हीं राष्ट्ररक्षाचीं मुळें आहेत...........मुळांकडे लक्ष द्या. त्यांना योग्य खत व पाणी यांचा पुरवठा करा. खरा राष्ट्रोद्धार राष्ट्राच्या गरीब मुळांपासून होणार आहे." —स्वामी रामतीर्थ.

कोणतेंही पुस्तक वाचल्यावर त्यांतील मथितार्थ व तें लिहिण्याचा लेखकाचा उद्देश हीं चाणाक्ष वाचक तेव्हांच ओळखतात. तेव्हां माझ्या मतें या पुस्तकाला ठराविक सांप्रदायाप्रमाणें प्रस्तावनेची पुस्ती जोडलीच पाहिजे असें नाहीं. तथापि प्रस्तावनेच्या योगानें वरील दोन्ही गोष्टी वाचकांपुढें प्रथमदर्शनींच डोळ्यांसमोर येत असल्यामुळें पुस्तकाची योग्यायोग्यता व तें वाचण्याची आवश्यकता वाचक तिच्यावरूनच ठरवितात.

या पुस्तकाला स्वतंत्र प्रस्तावना लिहिण्याची तितकीशी आवश्यकता नाहीं. वर उद्धृत केलेलीं दोन थोर पुरुषांचीं वाक्यें हीच या पुस्तकाची प्रस्तावना ह्मणून समजावी.

या पुस्तकाची ज्यांच्या तर्फें प्रसिद्धी होत आहे, ते एका मुलांच्या मासिकाचे संपादक आहेत ही गोष्ट व "शीलाचें मोल" हें पुस्तकाचें नांव, इत्यादि गोष्टींवरून हें पुस्तक मुलांकरितां–साधारण प्रौढ मुलांकरितां–लिहिलें गेलें आहे हें अगदीं उघड होत आहे. इंग्लिश वाङमयांत जशा केवळ मुलांकरितां ह्मणून कादंबऱ्या प्रसिद्ध होतात, तशा आपल्या मराठी भाषेंत अद्याप झालेल्या नाहींत, त्यामुळें प्रत्यहीं प्रसिद्ध होणारीं बरीं वाईट कादंबऱ्यांचीं पुस्तकें मुलें वाचीत असतांना जेव्हां माझ्या पहाण्यांत आलीं, तेव्हां त्यांची कादंबरीवाचनाची हौस भागवून, त्यांतल्या त्यांत जीवनक्रमास आवश्यक अशीं जीं सदाचार, पावित्र्य, धर्मश्रद्धा, गुरुजनसेवा, सत्यप्रियता, दीर्घोद्योग वगैरे नैतिक तत्त्वें, तीं त्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न करावा असें मनांत आलें आणि हें पुस्तक लिहितांना मनांतही हाच हेतु होता. ज्या उद्देशानें मुलांकरितां म्हणून स्वतंत्र अशीं

काहीं पुस्तकें आतांपर्यंत प्रसिद्ध झालीं आहेत, त्याच उद्देशानें परंतु जराशा निराळ्या दिशेनें हा प्रयत्न झाला असल्याचें आढळून येईल.

माझें पहिलें काव्य प्रसिद्ध झाल्यानंतर आज उण्यापुऱ्या एक वर्षानें हें पहिलेंच गद्य पुस्तक प्रसिद्ध होण्याचा समय येत आहे. अर्थात् हें पुस्तक पहिलेंच व अगदीं स्वतंत्र असल्यामुळें त्यांतील दोषांकडे, वाचक क्षमेच्या नजरेनें पहातील अशी आशा आहे.

प्रस्तावना लिहीत नाहीं म्हणतां म्हणतां प्रकरण हळू हळू लांबत चाललेलें पाहून आश्चर्य वाटणें साहजिक आहे; पण अझून मुख्य गोष्ट ती सांगावयाची राहिलीच आहे. हें पुस्तक मीं लिहिलें म्हणण्यापेक्षां मला लिहावयास भाग पाडलें असेंच म्हणणें अधिक यथार्थ होईल. कारण माझे मित्र रा. बाळकृष्ण रावजी पालवणकर यांनीं मला "मुलांकरितां एखादें स्वतंत्र पुस्तक लिहाच" या सप्तदशाक्षरी मंत्राच्या जादूनें भारून टाकलें नसतें तर माझी खात्री आहे, कीं हें पुस्तक मी लिहावयास घेतलें नसतें आणि घेतलें असतें तरी तें पुरेंही झालें नसतें. तेव्हां ही अल्पशी जी सरस्वतीची सेवा माझ्याहातून घडत आहे तिचें अर्धें अधिक श्रेय त्यांच्याचकडे जावयाचें आहे. मुलांकरितां वाङ्मय तयार करण्याचे प्रयत्न महाराष्ट्रांत आज ज्या दोन तीन व्यक्ती करीत आहेत, त्यांत रा. पालवणकर यांची गणना या पूर्वीच झालेली आहे. हें पुस्तक पुरें करून देण्याकरितां त्यांनीं मला जें उत्तेजन दिलें, त्यामुळें त्यांची कळकळ अधिकच दिसून आली. त्यांनीं मला दिलेल्या या उत्तेजनाबद्दल मी त्यांचा सदैव अत्यंत आभारीच असेन.

शेवटीं, ज्यांच्या करितां म्हणून मीं हें पुस्तक लिहिलें, त्या मुलांचें चारित्र्य सुधारण्याचे कामीं याचा यत्किंचित् तरी उपयोग होईल, असें जर अनुभवी विद्वानांनीं म्हटलें, तर मी माझ्या लिहिण्याचें सार्थक झालें असें समजेन.

कुडाळ,
तारीख १५।१०।१९.

विठ्ठल कृष्ण नेरूरकर,
पुस्तककर्ता.

शीलाचें मोल.

प्रकरण पहिलें.

पहिला नंबर.

संध्याकाळचे पांच वाजण्याचा सुमार होता. तो दिवस रविवारचा होता. एका बंगल्याच्या मागचे बाजूस, बंगल्यालाच लागून असलेल्या एका लहानशा खोलींत एक स्त्री तांदूळ निवडीत बसली होती. तांदूळ निवडीत असतां मधून मधून ती वाटेकडे निरखून पाही, आणि कोणी नाहींसें दिसतांच पुन्हा तांदूळ पाखडी. तिच्या डावीकडच्या बाजूस एक पिकलेल्या पेरूची कापटी पानावर ठेवलेली होती. बऱ्याच वेळानंतर तिचे तांदूळ निवडून झाले आणि शेवटीं ते ओतण्याकरितां ती घरांत गेली. ती तांदूळ निवडीत असतां कावळे वरचेवर येतच होते. ती आंत जाण्याबरोबर एक कावळा आला आणि तो पेरूचा तुकडा चोंचींत धरून भुर्ररर्रकन् उडून गेला. आंत गेल्यावर तिला आठवण झाल्यामुळें ती बाहेर घाईघाईनें पहावयास येते तों पेरू घेऊन जातांना कावळ्याला तिनें पाहिलें. त्याच्या मागून ती आंगणापर्यंत गेली. हेतु हा, कीं कावळा झाडावर बसला तर त्याला हांकवला असतां पेरू खालीं पडून आपणास मिळेल. पण कावळा जवळपास न बसतां तो बराच दूर उडून गेला आणि लांब कुठल्या तरी झाडावर जाऊन बसला असेल. तो तिला कसा दिसणार ? ती मात्र त्याच्याकडे नजर पोंचेल तेथपर्यंत पहात उभी होती. कावळा दिसेनासा झाला तरी ती त्याच दिशेकडे शून्य दृष्टीनें पहात उभी होती. पहातां पहातां तिच्या डोळ्यांत आंसवें आलीं. आपण बाहेर आंगणांत उभी आहों ही गोष्ट तिच्या लक्ष्यांत आल्यामुळें ती आपल्या खोलींत गेली आणि मनसोक्त रुदन करूं लागली.

“ उगीच त्या कावळ्याच्या मागें धांवलें. पेरू तो मेला कसला आणि तो मी त्या कावळ्याच्या तोंडांतला काढून घेणार होतें ? मागल्या जल्मीं मी कोणाच्या तरी तोंडांतलें अन्न काढलें म्हणून ह्या जल्मीं माझ्या तोंडांतलें अन्न गेलें. आतां

आणखी ह्या जल्मीं तसेंच करून पुढच्या जल्मींची तयारी करून कशाला ठेवूं ? पण बाळ सुंदर आला आणि त्यानं खायला मागितलंन् तर काय रे देवा देऊं ? तिचा कंठ गहिंवरून दाटून आला.

इतक्यांत कोणी धांवत येत असल्याचा तिला भास झाला. म्हणून पहाते तर तो सुंदरच होता. धांवत धांवत सुंदर आला, कोट टोपी त्यानें काढून घाईघाईनें खुंटीवर ठेवली; आणि हातांतलें पुस्तक उघडून त्यानें वाचावयास सुरवात केली. पण इतक्यांत काय आठवलें; कुणास ठाऊक, पुस्तक तसेंच हातांत घेऊन तो घरांत जाऊन पाहूं लागला, तों आईला चट्कन् पदरानें डोळे पुसतांना त्यानें पाहिलें.

" आई, असं ग काय ? तूं डोळे कां पुसतेस ? " सुंदर घाबरून म्हणाला.

" नाहीं रे बाळ. विस्तव पेटवीत होतें तो डोळ्यांना जरासा धूर लागला. तुला पुस्तक मिळालं ना ? केव्हांचा बाहेर गेलास तो आतां येतो आहेस. मी तुझी वाट बघून दमलें. सरस्वतीबाईनीं तुला—"

पण आपण न बोलण्याची गोष्ट उगीच बोलून गेल्यासारखें तिला वाटलें; म्हणून पुढचे शब्द ती बोलली नाहीं. पण अर्धें वाक्य ऐकल्यावर पुढचें समजून घेतल्याशिवाय सुंदरच्यानें कुठलें राहवतें ?

" सरस्वतीबाईनीं काय ? " त्यानें जवळ जाऊन विचारलें.

तिनें खूप टाळाटाळ केली, पण चाणाक्ष सुंदरला फसवणें तिला शक्य नव्हतें. त्यानें अगदीं तिच्या पुढयांत जाऊन आणि तोंड वर करून म्हटलें " सरस्वतीबाईनीं मला काय तें अगोदर सांग. "

तिनें झालेली हकीगत सांगितली; आणि त्याला पोटाशीं धरून व त्याच्या मस्तकावरून हात फिरवून त्याचे मुके घेऊं लागली. तिचा मातृप्रेमा अगदीं उचंबळून आला.

" हात्तिच्या ! एवढंच ना ? आई ! मी उद्यांपासून तुझ्याकडे खाऊ मागणार नाहीं हं ? पण तूं मात्र रडूं नको ! माझी काळजी करीत राहूं नको ! मनाला त्रास करून घेऊं नको. एवढं माझं ऐकशील ना ? ऐकशील ना ग ? "

" हं पोट कसं सालीसारखं पाठीला लागून गेलंय्. " त्याला कुरवाळीतच रमाबाई म्हणाल्या. "जा, आतां वाचीत बस जा. मी कामाला लागतें. पुस्तक तुला मिळालं ना ? जा लवकर वाचीत बस, परत त्याला नेऊन द्यावं लागेल. लोकांची

आणलेली वस्तु परत जशीच्या तशीच वेळच्यावेळीं नेऊन दिली म्हणजे बरी, मुला! त्यापासून आपली पत राहते आणि परत जरूर लागली तर ते पुन्हा द्यावयास कांकूं करीत नाहींत."

"अग हो! पण मी तुला सांगायला विसरलोंच. मला फार वेळ लागला तूं म्हणत होतीस ना? इतिहासाकरितां मी किती किती पण हिंडलों. कोणी देईना! जो तो म्हणूं लागला, आपणाला परीक्षेची तयारी करावयाची आहे. परीक्षा अगदीं जवळ आली आहे खरी. पण दामल्यांचा तो दामू कीं नाहीं, वाचीत नाहीं नी कांहीं नाहीं. आतां मी गेलों तर दोन तीन मुलांबरोबर खेळत होता. पण मला मात्र इतिहास द्यावयास कबूल होईना! वर्गांतल्या सगळ्या मुलांकडे मी फिरलों. पण मला कोणीच पुस्तक द्यावयास कबूल होईना. शेवटीं त्या बिचाऱ्या विनूनें दिला."

"बरं झालं एकदाचं."

"आणि माझ्याकडचं दुसरं एक पुस्तक त्यानें दोन दिवसांकरितां मागितलं आहे."

"दे त्याला, उद्यां नेऊन. आणि तोंपर्यंत तूं आपलं काम करून घे. जा तर बघूं आतां वाचीत बस."

"मी इतिहास दोन तीनदां वाचला आहे, आई. पण त्याला खूप दिवस झाले. आतां शेवटीं एकदा तरी उजळणी केली पाहिजे. परीक्षेपर्यंत मला एकदां तरी उजळणी करावयास मिळाली म्हणजे पुरे. सगळ्यांनाच का ह्याच वेळीं त्याच पुस्तकाची जरूर आहे? पण मला जास्त मार्क मिळतात. माझा नंबर पहिला असतो, म्हणून मला मुद्दाम कोणी पुस्तक देत नाहींत ग. सगळ्यांनीं माझ्या विरुद्ध कट केला असेलसें मला वाटतें. सरस्वतीबाई बऱ्या, पण त्यांचा गणू कीं नाहीं अगदीं वाईट. माझा कितीतरी द्वेष करतो म्हणून सांगूं? मी त्याचं कांहीं देखील वाईट करीत नाहीं. तो सांगेल तें सारं काम ऐकतों. आज तर त्याच्या हात-रुमालास देखील मी साबण लावला आणि दुपारीं स्नान करतांना धुतला देखील. तरी तो माझ्यावरच उलटतो."

ही हकीगत ऐकून रमाबाईंना पुन्हा कळवळून आल्यासारखें झालें. म्हणून त्यांनीं त्याला लवकर अभ्यासासाठीं बाहेर घालवून दिलें. त्यानंतर सुंदर कांहीं वेळपर्यंत एकसारखा इतिहासाचीं वरवर वाचीत पानांवर पानें उलटीत होता.

इतक्यांत त्याला जोरानें मारलेली एक हांक ऐकूं आली. ती ऐकण्याबरोबर तो एकदम दचकला. पण पुस्तक तसेंच ठेवून तिकडे गेला. गणूनें त्याला हांक मारली होती. त्यानें सुंदरला कसलेंसें काम सांगितलें आणि तें करण्यास जवळच कुठेसा तो निघून गेला. इतक्यांत गणू सुंदरच्या घरीं आला आणि बाहेरच पडलेल्या इतिहासांत खूण घालून ठेविलेलें पान उघडून त्यानें पाहिलें, तों सुंदरचा अभ्यास बराच पुढें आहे असें त्याला वाटलें. त्यानें आंत नजर फेंकली. रमाबाई कामांत गुंतल्या होत्या. आंतील दोन पानें त्यानें टरकन फाडलीं; नंतर त्या पुस्तकावर सही कोणाची आहे तें पाहिलें आणि चट्कन् दांतओंठ खात, हात पाय आपटीत निघून गेला. पण त्याची जातांवेळची चाहूल रमाबाईला लागली. ह्मणून त्यांनीं झट्दिशीं जवळच पडलेलें पुस्तक उचलून एका बाजूस ठेवलें आणि म्हणाल्या, "कोण गेलें तें ?"

"मी तो." गणपतनें उत्तर दिलें. त्याला मागें यावयास जरासा वेळ लागला. कारण क्षणार्धांत त्यानें दुसऱ्या एका मुलास हाक मारून त्याच्या कानांत कांहींसें सांगितलें व त्याला त्यानें कुठे दुसरीकडे पाठवून दिलें.

"कां, गणपतराव कुठें गेलां होतां ? तुम्ही केव्हांसे आलां होतां ?

"हा आतां नुकताच आलों होतों. सुंदर बाहेर कामाला गेला आहे. मी आपला सहजच आलों होतों, पण तुम्ही आंत गुंतलां असाल म्हणून गेलों झालें. आतां परीक्षा अगदीं जवळ आली आहे. अभ्यास केला पाहिजे सपाटून."

"हो तर, आपला अभ्यास करून वर्षाच्या वर्षास पास होत गेलं म्हणजे बरं असतं."

"पास व्हायला सारखी घोकंपट्टी करावी, तेव्हां कुठें आम्हांला कांहींतरी येणार. आम्ही थोडेच आहोंत तुमच्या सुंदरसारखे एकपाठी. सुंदरचा वर्गांत नंबर पहिला. म्हणून त्याच्यावर सगळ्या मास्तरांची मर्जी."

"त्याला कुठें मिळतो आहे अभ्यास करायला ? सकाळचा वेळ जातो बारीक सारीक कामधाम करून मधुकरी मागून आणण्यांत. संध्याकाळीं कुठें बसेल अभ्यासाला तर धड सारीं पुस्तकें देखील नाहींत."

"अहो, कशाला पाहिजेत त्याला पुस्तकें रमाबाई ? आतां त्यानें अभ्यास नाहीं केला तरी चालण्यासारखं आहे. कारण वशिल्याचं घोडं जिथं तिथं असतंच. एकवार पहिला नंबर आला, कीं मग त्याच्या अभ्यासाकडे एक तरी मास्तर

लक्षपूर्वक पाहील तर शपथ. परीक्षेंत तरी काय, तो अमका तमका मुलगा ना? तो पहिल्या नंबरास आहे. तर द्या त्याला मार्क, करा पास, द्या बक्षिसें. आहे काय नी नाहीं काय?"

हे गणपतचे शब्द रमाबाईंना लागले. त्या म्हणाल्या, "पण आतांपर्यंत जितके पहिले नंबर आले, त्या सर्वांशीं मास्तरांची अशीच वागणूक असेल नाहीं?"

"नाहींतर काय? आणि बारा महिने सुंदरशिवाय दुसरा कोण असतो पहिल्या नंबराला? गुणांची पारख होईल तर ना? आतांच रमाबाई तुम्ही म्हणालांत, कीं सुंदरला पुस्तकें नाहींत. तर मग याचा अभ्यास कसा होतो हो? आतां अभ्यासाशिवाय पहिला नंबर येणें फक्त दोनच गोष्टींवरून संभवतें. एक तर तो कॉपी करीत असला पाहिजे; किंवा दुसरें, मास्तर पक्षपात करीत असले पाहिजेत. दुसऱ्या नंबराला तो गोविंद आहे. तो खरोखरच फार हुषार आहे. पण त्याला कांहीं, त्यानें किती केलें तरी पहिला नंबर मिळत नाहीं. इंग्लिश सहाव्या यत्तेंतला पहिला नंबर ह्मणजे जशी कांहीं सुंदरच्या बापजाद्याची—सुंदरची मिरासच झाली आहे." इतक्यांत लांबूनच सुंदरला येतांना गणपतनें पाहिलें आणि तो निघून गेला.

सुंदर येण्याबरोबर त्याला आईनें विचारलें.

"काय रे सुंदर, कुठे गेला होतास तूं?"

"मला गणपतनेंच हरीकडे पाठविलें होतें. पण त्यांचें त्यांचें काय ठरलें होतें कोणास ठाऊक. हरीच्या बहिणीनें सांगितलें, हरी पूर्वीच इकडे आला आहे म्हणून. मला अभ्यासाला बसलेला पाहिला, कीं गणपत मला कांहींतरी मुद्दामच काम सांगतो. आह्मी ह्या श्रीमंतांच्या घरांत राहिलों ह्मणून आह्मांला त्यांचं एवढं तेवढं"—सुंदर आणखीही पुढें बोलणार होता. पण त्याच्या आईनें ओंठ चावून त्याला गप्प रहाण्याविषयीं खूण केली.

"उगी रहा. खुळाच अगदीं. ऐकतील ना कुणीतरी? आपण असें ह्मणूं नये. आपल्यावर त्यांचे उपकारच आहेत."

"तें खरं ग. पण—"

"अं! हं. कांहीं एक बोलायचं नाहीं मुळींच."

सुंदर उगी बसला.

इकडे सुंदरचें आणि सुंदरच्या आईचें हें बोलणें चाललें आहे त्याच वेळीं तिकडे हरीचें आणि गणपतचेंही कांहीं कुजबुजणें चाललें होतें.

" फारच चपळाई केलीस तूं हरी. विन्या येतो आहे ना ? "

" येतो आहे. तो पहा आलाच. त्याच्याबरोबर आणखी तो गोविंदाही पण आहे. खाशी झाली. आतां मात्र खरी गंमत उडेल. माझी कसली चपळाई. तूं तर कितीतरी चलाखी केलीस. तरी बरं आपल्याला त्याच्या आईनें पाहिलं नाहीं."

" आणि पाहिलंन म्हणून काय करील ? आमच्या घरांत राहिली आहे कशाला ? आईला आणि बाबांना सांगून घालवून देईन घरांतून, तें काय तिला ठाऊक नाहीं ? "

" पण ह्याला अभ्यास करायला वेळ मिळतो कसा, त्याचंच मला मोठं आश्चर्य वाटतं ! "

" चमत्कार आहे बुवा ! मी तर त्याला सारखा कांहीं ना कांहीं तरी काम सांगतच असतों. आज तर दोन तीन हातरुमाल साबण लावून धुवायला बसवला होता. "

" बरं झालं. माजलाय् कसा पाहिलास का ? "

"अरे काय झालं न माजायला. फुकटचं लोकांच्या घरचं अन्न मधुकरी मागून जेवायचं आणि असायचं. बरं आहे ह्मणावं. बघमजी पाहून घेईन. गणू म्हणे मला काम सांगतो. आईला सांगत होता माझ्या चहाड्या. मी सारं त्यांचं बोलणं आडून ऐकलं. तो आलाच विन्या. आतां कर म्हणावं इतिहास आणि ये पहिला नंबर. तुला पहिला नंबर देतों. दमधर तूं ! पण तीं पानें काय केलींस रे ? "

" दिलीं आगपेटीच्या काड्यांना." मोठ्या विजयोत्सित मुद्रेनें हरीनें उत्तर दिलें.

इतक्यांत गोविंद व विनू समोर गणपतकडे आले. पण गणपतनें नुसती डोळ्यांची खूण करण्याबरोबर दोघेही सुंदरच्या खोलीकडे वळले. सुंदर इतिहासवाचनांत गढून गेला होता.

विनायक सुंदरकडे चालला होता म्हणण्यापेक्षां त्याला चालवलें होतें म्हणणेंच अधिक शोभेल. त्याचें पाऊल देखील उचलत नव्हतें. त्याच्या स्वतःच्या इच्छेविरुद्ध त्याला वागणें भाग पडत होतें. पुढचे शब्द बोलण्यास त्याचें तोंड तयार नव्हतें. सुंदर आणि विनू समानशील आणि समदुःखी होते.

विनू पुढें झाला, नव्हे त्याला गोविंदानें पुढें ढकललें आणि आपण जरासा बाजूस राहिला. विनूला बराच वेळपर्यंत सुंदरनें पाहिलें नव्हतें. पण त्याचें पान संपलें आणि तें उलटणार तोंच विनूनें त्याला हांक मारली.

"सुंदर ?"

सुंदर दचकला. तो म्हणाला, "विनू, अरे तूं इतक्या संध्याकाळचा कां आलास ? आतां तर काळोख पडावयास आला. तुला माझ्याकडचें पुस्तक मी उद्यां देणारच होतों. आतांच कां इतक्या तांतडीनें आलास ?"

"तसंच काम आहे कांहीं."

"कोणतें तें ?"

पुढचें उत्तर देण्यापूर्वी त्यानें दरवाजाकडे बाहेर नजर केली. तों हरी, गोविंद, गणपत ह्या तिघांचेही लाल डोळे आणि क्रोधाविष्ट मुद्रा त्याच्या दृष्टीस पडल्या. सर्वांनीं त्याला खुणांनीं दहशत घातली. विनायक मनांत चरकला. त्याची छाती धडधडूं लागली. तो बोलत नाहींसें पाहून सुंदर म्हणाला—

"सांग ना कां आलास तो ?"

"मला माझा इतिहास पाहिजे."

"आतांच ?"

"आतांच पाहिजे."

"म्हणजे रे ?"

"म्हणजे काय ? पाहिजे एवढें खरें."

"अरे असें काय करतोस, मी उद्यां देतों."

"छे छे. आतांच पाहिजे. दे लवकर."

"घे तर बाबा आपलें पुस्तक, पाहून घे." असें म्हणून त्यानें सहज पुस्तक उघडून त्याला दिलें. तों दोन मधलींच पानें फाटलेलीं विनायकास दिसलीं.

"अरे, हें काय ?" विनायक म्हणाला.

"कुठे ?" सुंदरनें विचारलें.

तीं फाटलेलीं पानें पाहून सुंदरला रडेंच कोसळलें.

इतक्यांत गणपत, हरी, व गोविंद एकदम आंत आले.

"कसं काय सुंदर, अभ्यास जोरांत चालला आहे ना ?" गोविंद म्हणाला.

"अरे तूं इकडे कुठे ?" विनायकास उद्देशून गणपत म्हणाला.

"अरे हा सुंदर रडतो कां ?" हरी म्हणाला.

"हीं पुस्तकाचीं पानें केव्हां फाटलीं विनू ?" गणपतनें विचारलें.

"ह्या पुस्तकाचीं पानें काल चांगलीं होतीं." हरी म्हणाला.

"बहुतेक कॉपीची तयारी असेल !" दुष्टपणाचें हंसें मुद्रेवर आणून गणपत म्हणाला.

"शाबासुरे ! पहिला नंबर."

सर्वजण एकदम मोठ्यानें ओरडले. सुंदर चकित होऊन गेल्यामुळें तो चित्रासारखा स्तिमित होऊन उभा होता.

प्रकरण दुसरें.

ठराव पास झाला.

सुमारें साडेदहा वाजण्याच्या सुमारास सुंदर अण्णासाहेबांच्या ओट्यावर एका हातांत पाणी भरलेली पंचपात्री आणि दुसऱ्या हातांत मधुकरी घेण्याकरितां लोंबणारा चौपदरी पांढरा सफेत स्वच्छ रुमाल घेऊन उभा होता. देवपूजा आटोपून अण्णासाहेब ताम्हनांतलें संध्येचें पाणी तुळशीच्या बृंदावनांत ओतण्याकरितां येतात, तों सुंदरची सुंदर बालमूर्ती त्यांच्या दृष्टीस पडली. खरोखर सुंदर त्यावेळीं अतिशयच सुंदर दिसत होता. पुष्कळ मुलें नानाप्रकारचे चित्रविचित्र उंची उंची कपडे पेहरून सुंदर दिसण्याचा प्रयत्न करितात. सुंदर तर बिचारा अगदीं सडसडीत उघडा होता. पण आंगावर पावित्र्याचें तेज झळकत होतें. बुद्धिमत्त्वदर्शक प्रशस्त मस्तकावर आडवें गंध लावलें होतें. तसेंच हात, पोट यांवरही गंधाची लेही शोभत होती. गळ्यांतलें स्वच्छ यज्ञोपवीत उजव्या मांडीपर्यंत रुळत होतें. कटीदोऱ्यांतून सोंवळ्याची लाल लंगोटी त्याच्या गोऱ्या देहास फारच शोभवीत होती, आणि त्याची सर्वच आकृति पंधरा सोळा वर्षांच्या वयाच्या मानानें गुटगुटीत आणि सतेज होती. इतक्या गरीबींत वाढलेला सुंदर आणि तो इतका बांधेसूद, आणि श्रीमंतांचीं मुलें धीशक्कर खाऊन देखील, कोणी गलिच्छ तर कोणी अत्तरांच्या वासाखालीं कपड्यांचा घामटपणा छपविणारे ! लहान वयांतच शरीर वायुबद्ध होऊन सुटूं लागलेलें, तर कोणास रोजचें जेवण

देखील जात नाहीं इतका नाजूकपणा आलेला मधुकरी मागून आपला आणि आपल्या आईचा उदरनिर्वाह करणाऱ्या सुंदरचें आरोग्य चांगलें कां होतें हें पुढें कळेलच. पण त्याचें आरोग्य, त्याचा तो उघडा पवित्र देह पाहून कुणालाही क्षणभर आनंद होऊन मन प्रसन्न होई. अण्णासाहेबांच्या तोंडानें कसल्याशा स्तोत्राचा पाठ चालला होता, म्हणून त्यांनीं त्याला मानेनेंच जरा उभें रहाण्यास खुणावून आपण बाहेर आंगणांत गेले. पण तेवढ्याच अवधींत सुंदरच्या कानांवर पुढील संवाद सुंदरच्या पाठीमागच्या खोलीतून आला. सुंदरचें लक्ष्य तिकडे प्रथम गेलें नाहीं पण नंतर तें तिकडेच लागलें.

" मला बाकीचें कांहीं विशेष वाटत नाहीं, पण आश्चर्याची गोष्ट ह्मणजे अशी, कीं त्या बापड्या विनायकास कोणी विचारीत नाहीं आणि ह्या सुंद्र्यालाच जो तो मदत करायला तयार." गणपत ह्मणत होता.

" नशीब आहे पोऱ्याचं जोरावर" गोविंद ह्मणाला.

" आमचे अण्णा तर त्याला आतां दादासाहेबांच्या स्वाधीन करणार आहेत असा रंग दिसतो." हरि ह्मणाला.

" तें रे बाबा कशाला ? दादासाहेबांचें त्यानं काय केलेंन् आहे ?" गोविंदानें विचारलें.

" दादासाहेबांच्या पेढीवर त्याला नोकरीला ठेवणार आहेत. "

" मग त्याला स्वाधीन करणें ह्मणतात काय ?" गोविंद, हरीची मराठी भाषेची चूक सर्वांच्या नजरेस येईल असा हावभाव करून हांसला. त्याला गणपतनेंही यथाशक्ति मदत केली.

" जाऊं दे कीं, आतां बाकीच्या गोष्टी कशाला ? पंधरावीस दिवसांपूर्वी, आह्मी केलेली सर्व खटपट फुकट गेली–आणि त्याच्यापूर्वी काय थोडे प्रयत्न केले होते ह्मणा; शेवटीं पहिल्या नंबरचें बक्षीस देखील बहुतकरून सुंद्र्याला मिळणार हें ठरल्यासारखेंच आहे. वाईट वाटतें तें एवढेंच, कीं मी आणि गणपत नापास झालों ह्मणून नव्हे तर तो बिचारा विन्या नापास झाला आणि सुंद्र्याला बक्षिस मिळणार ! जसें काय गोविंदाला कांहींच येत नाहीं. आमचें काय ? आमचे तेवढे विषय घटतील. उगीच घाईघाईनें वर वर चढत जाऊंच नये. कारण मी एकदां असें अण्णांसच बोलतांना ऐकलें आहे, कीं पुढच्या वयांत विषय बुद्धीला कळून आपोआप समजतात, आणि लहान वयांत ते घोकंपट्टी

करून पास व्हावें लागतें. आपणाला तें बिलकुल पसंत नाहीं. तें सोडून द्या. पण मॅजिक लँटर्नला जावयाचें कीं नाहीं तें अगोदर ठरवा पाहूं ?" हरि म्हणाला.

इतक्यांत सुंदरचें काम झालें व तो जावयास निघाला—तो जाणार नव्हता. कारण त्याचें वरील बोलण्याकडे लक्ष गुंतलें होतें. पण त्याला कारणाशिवाय तेथें आतां अधिक वेळ उभें राहतां येत नव्हतें. अशा स्थितींत तो घुटमळतो आहे, इतक्यांत खुद्द अण्णासाहेबांनीं कागदांत गुंडाळून एक लाडू आणला आणि तो सुंदरच्या हातांत दिला. सुंदरनें तो घेतला आणि तडक तेथून निघाला. पुढचें भाषण आपणास चुकलें म्हणून जरी त्याला वाईट वाटत होतें, तरी आपणास परीक्षेंत पहिल्या नंबरचें बक्षिस मिळणार हें ऐकून त्यास इतका आनंद झाला होता, कीं तें वर्तमान आपल्या आईस जाऊन केव्हां सांगावें असेंच त्यास झालें होतें. जातां जातां त्याचें लक्ष हातांतल्या कागदांत गुंडाळलेल्या लाडवाकडे गेलें. ज्या हातांत त्यानें तो चौपदरी रुमाल धरला होता त्याच हातांत अडचणीनें तो वर कागद गुंडाळलेला लाडू होता. कारण दुसरा हात पंचपात्रीस गुंतला होता. त्याची सहज नजर त्या लाडवावरच्या कागदावर गेली. तों तो केसरीच्या जुन्या अंकाचा एक दुमडलेला तुकडा होता व त्यावर मोठ्या ठळक अक्षरांत 'खेळगडी' मासिकाची जाहिरात असल्याचें त्याला दिसून आलें. तीं अक्षरें तो वर वर वाचीत होता; पण सारें लक्ष आईकडे होतें. घरीं केव्हां आलों हें देखील त्याला कळलें नाहीं.

पुढचा संवाद जरी सुंदरला चुकला तरी आपणाला कांहीं तसें निराश होण्याचें कारण नाहीं. कारण अण्णासाहेबांच्या ओटीवर प्रवेश केला असतां डाव्या बाजूस जी एक खोली आहे त्यांत हरी अभ्यासाला बसत असे. हरीच्या खोलींत आज सर्वांची सभा भरली होती.

हरीनें लांबलचकसें भाषण करून सर्वांचें लक्ष त्या दिवशींच्या सभेचा मुख्य विषय जो मॅजिकलँटर्न तिकडे पुनरपि वेधविण्याचा प्रयत्न केला, हें वर सांगितलेंच आहे. तरीही पण गणपत म्हणाला "कायरे हरी; पण ही तुझी हकीगत अगदीं खरी आहे का ?"

"अरे खरी म्हणजे. मी हें आमचे मास्तर आणि अण्णा यांच्यामध्यें चाललेलें बोलणें स्वतःच्या कानांनीं ऐकलें. मी इथें होतों हें दोघांनाही ठाऊक नव्हतें, म्हणूनच बरें; नाहीं तर असतें मिळालें मला ऐकायला."

"उद्यां सोमवारीं रिझल्ट कळेलच ना आपल्याना?" गोविंद अध्यक्ष-स्थानावरून ह्मणाला.

"कळेना काय तें. आह्मांला नाहीं लागलेली रिझल्टची एवढी काळजी." हरी आणि गणपत एकदम ह्मणाले.

"बरं पण हरी काय म्हणत होता?" अध्यक्ष साहेबांनीं विचारलें.

"मॅजिक लँटर्नला जावयाचें ठरवतां कीं नाहीं? असें मी विचारीत होतों."

"बाकी आपण आज बरीच त्या पाद्र्यांची गंमत केली नाहीं रे? दामू देखील आपल्यांत येऊन मिसळलाच शेवटीं." गणपतनें विचारलें.

"गंमत ह्मणून काय विचारतोस? मजा उडालीन् काय गड्या! पण आमचे गोविंदराव अगदीं अलग राहिले. हें मात्र बरें नव्हे हो. दुसऱ्यांना पुढें घालून आपण नामानिराळें राह्यचें हें नाहीं आपल्याला पसंत बुवा." हरी ह्मणाला.

"गोविंदरावांची गोष्ट निराळी. ते निदान हूं हूं ह्मणून आह्माला उत्तेजन तरी देत होते. पण तो सुंद्र्या रे! त्या सुंद्र्याला पाहिलास का तूं? कसा लुचा लांब उभा राहून मौज पाहात होता? जवळ येईल तर हराम. दोन कार्टीं दोन प्रकारचीं आहेत तीं. विन्या तर त्याच्याशीं इतकी सलगी दाखवीत होता, कीं आपण जसे कांहीं मिशनऱ्यांपैकींच कोणी आहों असें त्याला वाटत असावें."

हें सर्व बोलणें ऐकून गोविंदाला मनांतल्या मनांत कितीतरी आनंद होत होता, पण बाहेरून आपण जसें कांहीं तिकडे विशेष लक्ष दिलेलें नाहीं असें दाखवून तो ह्मणाला--

"बस्स सारे चूप रहा. सगळेच गडबड करूं नका. मला असें वाटतें कीं, आपण सगळ्यांनीं मिळून मॅजिक लँटर्नला जायचं. आहे काय त्यांत? कांहीं तिकीट देखील घ्यावयास नको. अधिक रात्र केली नाहीं ह्मणजे झालं. कारण वडील माणसं रागावतां नयेत. काय समजलांत?" मधें व्याख्यात्यासारखी मान करून गोविंद ह्मणतो, "मौज पाहून येऊं घटकाभर."

"ठरलं तर मग हें?" हरीनें विशेष जबाबदारीच्या आविर्भावानें विचारलें. कारण तो जरी आज अध्यक्ष नव्हता तरी सभेस दिवाणखाना त्याचाच उपयोगी पडला होता. तेव्हां त्यालाही थोडासा प्रेक्षकांहून जास्त असा अधिकार प्राप्त झाला होताच. त्यानें आपल्या कोटाच्या दोन्ही खिशांत हात घालून ताठ उभें

राहून, बूट पाटलोण घातलेले व्याख्याते अथवा एखाद्या कार्यकारी कमिटीचे सभासदच आपण आहोंत असें वाटून तो ह्मणाला—

" मग ठरलेंना हें ? "

" हो ! हो ! ठरलें, ठरलें" सर्वांनीं एकमतानें एकदम ह्मटलें.

ठराव सर्वानुमतें पास झाला.

" चला तर आतां, उशीर फार झाला. जाऊं या."

सर्व जावयास उठले. हरी कपडे उतरूं लागला. परंतु त्याला गणपत ह्मणाला, " वाहवा रे हरीभाऊ, आह्मी सारे तुझ्या खोलींत आलों आणि आतां तूं तर आह्मांला पोंचवायालाही येत नाहींस. हें कांहीं बरोबर नाहीं. मी सांगूं ? तूं आमच्याबरोबर कंपाउंडच्या बाहेर तरी आलेंच पाहिजे."

" अलबत्, अलबत्, आलेंच पाहिजे." बाहेर पडतां पडतां गोविंद ह्मणाला. मग काय ! गोविंदाचें ह्मणणें हरी कसा मोडील ? त्यानें सदरा अंगांत तसाच ठेवला आणि तो त्यांच्याबरोबर बाहेर पडला.

त्याला बाहेर पडतांना पहातांच काशी बाहेर येऊन ह्मणाली, " अरे भाऊ ! आतां आणखी कुठें जातो आहेस रे ? अकरा वाजून दिखील गेले. आंघोळ नाहीं का करायची ? आई तुला लवकर बोलावते आहे, लवकर."

बोलण्याच्या घाईंत असल्यामुळें हरीचें तोंड मोकळें नव्हतें; ह्मणून नुसती मान मागें फिरवून त्यानें " चूप रहा " अशा अर्थाची ओंठ चावून आणि डोळे वटारून नुसती धमकी दिली. त्याबरोबर ती बापडी घरांत पळाली. पण तितक्यांत आईनें तिला परत पाठवल्यावरून ती त्यांच्यामागून धांवत येऊन म्हणाली—

"भाऊ, तुला आई लवकर बोलावते आहे. चल-चल लवकर. मग कुठें तो जा."

त्याबरोबर संध्याकाळीं सगळ्यांनीं कुठें जमावें ह्या बेताच्या मसलतींत मग्न झालेला हरी तिच्यावर धावून गेला, आणि तिचा त्यानें असा एक गालगुचा घेतला, कीं तिच्या डोळ्यांसमोर हिरवें पिवळेंच दिसूं लागलें. तिचें पारिपत्य करून तो मागें फिरणार तोंच, खुद्द दादासाहेबांसच पोंचवीत, त्यांच्याबरोबर बोलत अण्णासाहेब बाहेर आले होते. ते जात असलेल्या दादासाहेबांस जरा पुढें होऊन ह्मणाले, " बाकी तसें करण्याची कांहीं जरूरी नव्हती. पण मी मुद्दामच सुंद-

रचा प्रामाणिकपणा पाहण्याकरितां आज एक प्रयोग केला आहे. निकाल काय होतो तो पाहूं."

"ठीक आहे, ठीक आहे" असें म्हणून दादासाहेब गेले.

परंतु हे शब्द बरखास्त झालेल्या सभेच्या कांहीं मंडळींच्या कानीं पडले.

"ऐका, ऐका!" हरी ओंठातल्या ओठांत पण मोठ्यानें म्हणाला.

"ऐकलं मी सारं." गणपत मान तुकावून म्हणाला.

"काय तें?" गोविंदानें विचारलें.

"आतां यांत तरी त्यास यश येऊं देतां नये" गणपत निश्चयानें म्हणाला.

"पण काय तें मला सांगा ना?" गोविंद हुकमी स्वरानें म्हणाला. त्याला थोडक्यांत हरीनें ऐकलेली गोष्ट अनुमानानें सांगितली. तो म्हणाला "मी जें मघांशीं सांगत होतों, कीं दादासाहेबांकडे लवकरच अण्णा सुंदरची सोय करणार म्हणून तें हेंच. ते बघा दादासाहेब बाहेर पडताहेत; अण्णा त्यांना पोंचवायाला आले आहेत. थांबा जरा; बाजूला चला. नाहीं तर मला पाहतील. त्यांनीं आतां काय म्हटलं तें आपण ऐकलंच आहे. बेट्याचं नशीब जोरावर आहे."

"मग? ह्याला काय उपाय करावयाचा तो तूंच केला पाहिजेस?" गणपत म्हणाला "खरं कीं नाहीं गोविंदराव, मी म्हणतों तें?"

"आपल्याला कांहीं असल्या गोष्टींत फारसें कळत नाहीं. पण गणपत काय म्हणेल तें नेहमींच खरं असतं. तो खोटं बोलतच नाहीं. एवढें मात्र मला ठाऊक आहे." गोविंद मनांत आनंदित असतांही साळसूदपणानें म्हणाला.

बस्स, प्रामाणिकपणा पाहण्याकरितां अण्णांनीं कसला प्रयोग केला आहे तें काढलें पाहिजे, आणि त्याचा मी प्रयत्नही करीन." करारी स्वरानें हरी म्हणाला.

"मला वाटतें संध्याकाळच्या गंमतीला आपण सुंदरलाही घ्यावें." गोविंद म्हणाला. वास्तविक ह्या भाषणानें दुसराच हेतू त्याला सुचवावयाचा होता आणि तो हेतू त्याच्या त्या शब्दांनीं साध्यही पण झाला. कारण त्याच सूचनेवरून हरी म्हणाला "अरे गणपत! मी सांगूं का? तूं संध्याकाळीं त्याच्याशीं गोड गोड बोलून त्यालाही बरोबर घे."

"तें काम माझ्या शिरावर; पण असें करून काय फायदा होणार?"

"अरे, त्याला निरनिराळे प्रश्न विचारून पाहूं." हरी म्हणाला.

"इतका काय तो दुधखुळा आहे?" गणपतनें विचारलें.

"नाहीं तर काय ? पहिल्या नंबरला पास होणारीं मुलें बहुतेक व्यवहारांत डफ्फरच असतात. मला सारें ठाऊक आहे. चौथ्या यत्तेंत दोन वर्षें आणि पांचवींत दोन वर्षें मीं काढलीं आहेत, तीं कांहीं उगीच नाहींत, आणि आतां सहावींतलें हें पहिलें झालें व दुसरें लागलें. माझ्या वयाला एकुणीस वर्षें झालीं आणि तितका मला जगाचा अनुभवही आहे. गोविंदराव हुषार असतील, पण मला नाहीं वाटत त्यांना माझ्याइतक्या गोष्टी कळत असतील म्हणून—" इतक्यांत गोविंदाच्या माना चेहऱ्यावर जरा विशेष लालसर गरम छटा चढलेली पाहून तो पुढें म्हणाला—"अंहं—म्हणजे माझ्या बोलण्याचा भावार्थ असा कीं, हुषार मुलें सर्वत्र चोंहीकडे हुशार असतात असें नाहीं. गोविंदरावांची गोष्ट सोडा. तेव्हां काय म्हणत होतों मी तें ? आलें ध्यानांत. त्याला प्रश्न करून तर आपण पाहूं ? नाहीं तर मग दुसरे मार्ग आपणास आहेतच. तूं त्याला बरोबर घेऊन ये." गणपतकडे पाहून हरीनें म्हटलें.

"बरं आहे. त्याला बरोबर आणण्याचा मी प्रयत्न करतोंच. बाकी तो येईलसें कांहीं वाटत नाहीं. आतां तो खरें बोलणारा असल्यामुळें कदाचित् तुला याच्याच तोंडून कांहीं गोष्टी काढतां येतील. हें जरी खरें, तरी तो रात्रीं आमच्याबरोबर येईलच असें मात्र नाहीं. कीर्तनाला, पुराणाला कदाचित् घटकाभर बसेल, आणि तेंही अभ्यास करायचा नसला तर. पण असलें कांहीं नाहीं ऐकायचा !" गणपत म्हणाला.

"तर मग आज कीर्तनही आहेच, त्या तुमच्याच घराशेजारच्या मुरलीधराच्या देवळांत." हरी म्हणाला.

"तर मात्र मी प्रयत्न करतोंच. येतांना कीर्तनाला येऊं या, म्हणून सांगून मी त्याला बरोबर घेतों." गणपत निश्चयानें म्हणाला.

इतक्यांत हरीच्या नांवानें मारलेली हांक हरीला ऐकूं आली. त्याबरोबर तो घराकडे निघाला.

जातां जातां त्यानें पुन्हा एकदा मागें वळून विचारलें.

"मग ठरलें ना एकंदर बरोबर ?"

"ठरलं ! ठरलं !"

सर्व जण आपापल्या घराकडे जावयास निघाले.

थोडेसे पुढें जातात, तों दामू आणि विनायक कंपाउंडच्या आड असलेले गोविंदाच्या आणि गणपतच्या नजरेस पडले. ते बोलत बोलत तेथें बराच वेळ उभे असावेसें त्याला वाटलें. कारण ते दोघेही सावकाश कसलेंसें रंगीबेरंगी व गुळगुळीत कागदाचें एक सुंदर चित्र असलेलें पुस्तक घेऊन त्याविषयींच बोलत हळूहळू चालले होते. पण त्यांच्याकडे लक्ष देण्यास आतां ह्या दोघांसही वेळ नव्हता.

प्रकरण तिसरें.

मॅजिक लँटर्न्.

"पण उशीर लावूं नकोस हो." रमाबाई सुंदरला ह्मणाल्या.

"नाहीं, माझ्या मनांत देखील जायचं नव्हतं. पण आतां परीक्षा आटोपली आहे. विनूनेंही मुद्दाम मला आग्रहानें बोलाविलें आहे, आणि तिथें थोडासा वेळ राहून मग मुरलीधराच्या देवळांत कीर्तन असलें तर घटकाभर बसेन आणि मग येईन. लांब नाहीं कांहीं. जवळच्याच गल्लीच्या पलीकडचे नाक्यावर आहे मॅजिक लँटर्न आज." सुंदर म्हणाला.

"त्या विनूचा रंग कांहीं निराळाच दिसतोय मला. त्याच्या संगतीला तूं लागूं नको. माझं आपलं सांगणं तूं ऐक." रमाबाई म्हणाल्या.

"कशावरून? त्यानें त्या दिवशीं माझ्याकडून इतिहास काढून घेतला ह्मणून तूं म्हणतेस ना? त्यानें मला सगळी हकीगत सांगितली. त्याला त्या गणू वगैरे मंडळीनें, मुद्दाम मला वाचावयास मिळूं नये म्हणून माझ्याकडून पुस्तक मागून घ्यावयास लाविलें. त्यांनें तें मला दोन दिवसांकरितां दिलेंच होतें. त्याचा नाइलाज होता. कारण त्यानें त्यांचें ऐकलें नाहीं, तर भलत्या सलत्या कागाळ्या त्याच्या आंगावर घालून त्याला मास्तरांकडून मारावयास लावतात, नाहीं तर उगीच त्याच्याबरोबर भांडण उकरून त्यास शिव्या देतात, मारतात; त्याचे हाल हाल करतात. ह्मणून त्याच्या मनांत नसतांना देखील त्याला माझ्याकडचं बूक हिसकून घेणें भाग पडलें. त्याची स्थिति माझ्यापेक्षां देखील केंविलवाणी आहे. काय करील बिचारा." सुंदर आईला ह्मणाला.

होय का ? तर त्याचा दोष नाहीं. पण मी त्याबद्दल ह्मणतच नाहीं. त्या दिवशीं कोणसं मला ह्मणालं, कीं तो पाद्र्यांच्या बरोबर फिरतो. त्यांच्या तंबूकडे जातो, आणि तो ह्मणे लवकरच बाटणार आहे !"

" आं ! हें नाहीं मला माहीत !" सुंदर कपडे करीत असतां ह्मणाला. "बाकी कुठल्याशा मिशनऱ्यांकडून त्याला बरीचशी मदत होते असें तो देखील मला आज ह्मणत होता खरा. आपले लोक कांहीं आपल्या जगांतल्या गरीबांकडे [illegible] नाहीत; मग दुसऱ्यांनीं दिलेली मदत देखील घेऊं नये तर त्यानें काय किंवा मी काय, काय करावें सांग बरं ?"

" अस्सं काय ? तूं जाऊंच नकोस कसा !" रमाबाई रागानें म्हणाल्या. "असले विचार जर तुझ्या मनांत घोळत असतील, तर तूं तिकडे बिलकूल जाऊं नको. विनायकाचेच विचार असतील हे. तुझे स्वतःचे नसतील. पण कुणी सांगावं ? संगतींत स्वभावदिखील बदलतो माणसाचा !"

" उगीच रागावतेस कां आई ? मी तसं कसं करीन, पण विनू मला फार मदत करितो आणि खरोखरच तो चांगला प्रेमळ मित्र आहे. त्याला वाईट वाटेल ह्मणून मी जातों. तो माझी वाट पहात राहील—"

" अरे सुंदर ! विसरलेंच सांगायला. गणपत तुझ्याकडे आज संध्याकाळीं दोनदां येऊन गेला. काम काय आहे ह्मटलं तर सांगे ना ! शेवटीं तिसऱ्या खेपेस देखील तूं बाहेर गेलेला भेटलास नाहीं. तो तुला भेटला काय ?"

" नाहीं. आला असेल कांहीं काम सांगायला. बरं मी जातों. माझी टोपी कुठें आहे ?" रमाबाई टोपी शोधीत असतां एका फळीवर ठेविलेला सकाळचा कागदांतला लाडू तिला सांपडला. टोपी खालीं तिच्या हातून पडली. ती झाडण्याकरितां त्यांनीं तिच्यावर जोरानें हात मारला. त्याबरोबर ती दिव्याच्याजवळच उभी असल्यामुळें वाऱ्यानें दिवा माउवला. त्यांनीं काळोखांतच टोपी सुंदरच्या डोकीवर ठेवली आणि म्हणाल्या—"

" अरे ! मी तुला मघाशीं लाडू द्यायला विसरून गेलें सुंदर ! तूंच कां नाहीं घेऊन खाल्लास तो ? आतां घेतोस ?"

"नको आतां. राहिला तर राहूं दे. उद्यां त्याचा उपयोग होईल. आतां ठेव तसाच. हो पण त्याला गुंडाळलेला कागद आहे तो; तो काढून घे. आणि दुसऱ्या कशांत तरी गुंडाळ. कारण त्या कागदावर केसरीच्या एका हल्लींच्याच

अंकांत ' खेळगडी ' मासिकाची जाहिरात आहे. जमलें तर मला तें मागवाव-याचें आहे. त्याला तूप लागेल." इतकें बोलून सुंदर बाहेर पडला.

"आंथरूण घालून ठेवतें; लवकरच ये हो !" असें म्हणून रमाबाईनीं काळोखांतच तो दुमडलेला कागद रुंद केला, तेव्हां त्यांस आंत आणखी एक कागदाचा असलेला लहानसा चिटोरा जमिनीवर पडल्याचा भास झाला. परंतु तो चिटोरा म्हणून त्यांनीं उचलून न घेतां मोठा तुकडा घडी करून जपून ठेवला आणि लाडू एका पानांत गुंडाळून दुसऱ्या दिवसाकरितां ठेवून दिला. पण मागून हा तरी कागदाचा तुकडा फुकट कां घालवावा, तेवढा देखील वेळेवर मिळत नाहीं, त्याचा देखील एकादेवेळीं उपयोग होतो, नव्हे वेळेवर अडतें सुद्धां; असा विचार करून त्यांनीं तो चिटोरा चांचपून शोधून काढला आणि जपून ठेवला.

सुंदर निघाला तो थेट विनायकानें सांगितलेल्या वाटेनें झपाझप चालूं लागला. त्याला कांहीं लांब जावयाचें नव्हतें. त्याच्या घरापासून जवळच असलेल्या एका गल्लींतून गेल्यावर मुरलीधराच्या देवळास उजवें घालून जरा पुढें गेला कीं शहरांतला मुख्य रस्ता लागतो; त्या रस्त्यानें पन्नास साठ कदम आणखी पुढें गेल्यावर दोन रस्ते एके ठिकाणीं येतात आणि तेथूनच पुढें त्या गांवच्या बाजारास आरंभ होतो. ह्या चौकावरच आज मॅजिक लँटर्नचा थाट होता.

मुख्य रस्त्यावर येतां क्षणींच त्याच्या कानांत खालील गाणें पडलें. रात्रीची शांत वेळ. जिकडे तिकडे शांतता. चंद्रोदय होण्यास बराच अवकाश होता. आकाशांत चांदण्याच लुकलुकत होत्या. अशा वेळीं हातबाजाच्या सुरांत, व गोड आवाजांत झटलेलें गाणें कोणासही प्रथमारंभीं आनंद देई.

सद्गुरूवांचुनी । तारण होईना
मळ हा जाईना । हृदयाचा १
म्हणुनि पाप्यांचें । ओझें वाहणारा
मुक्त करणारा । असावा तो २
निष्कलंक आणि । दयाळू तो व्हावा
समर्थ असावा । सर्वज्ञ तो ३
नांवाचे हे गुरू । होती गल्लोगल्लीं

तारणाची किल्ली । एका हातीं ४
होऊनियां नम्र । ठेवा पूर्ण भाव
ख्रिस्त होय नाव । तारणारी ५

शब्द अस्पष्ट असल्यामुळें ते कांहीं सुंदरला ऐकूं येत नव्हते. पण गाणें गोड लागलें म्हणून तो पुढें अधिक जोरानें चालूं लागला, आणि थोड्याच वेळांत नादाच्या अनुरोधानें त्या जागीं येऊन पोंचला. पाहतो तर त्याला तेथें मोठा मजेदार देखावा दिसला.

चौकावरच एक पडदा उभा केला असून तो पोंचला तेव्हां त्याच्यावर येशू-ख्रिस्ताचें चित्र उमटलें होतें. ख्रिस्ताला खांबावर चढवून त्याच्या आंगांतून खांबांत खिळे ठोकले आहेत आणि अशा रीतीनें त्याचा अंत झाला आहे अशी माहिती त्या पाद्र्यांच्या मंडळीपैकीं एकजण देत होता. डोळ्यांत पाणी आणून तो मोठ्या कळकळीनें भाषण करीत होता. मधून मधून तो आपले तीक्ष्ण कान कुठून कसला ध्वनी येतो कीं नाहीं हें अजमावण्याकरितां लावी. कारण कुठून तरी एखादा सुस्कारा किंवा "चुक्चुक्" असा सहानुभूतिपर ध्वनि आला, कीं तो दुप्पट करुणस्वरानें पुन्हा भाषण करी. आपल्या भाषणाचा एकदम श्रोत्यांच्या मनावर परिणाम व्हावा अशी त्याची इच्छा होती.

त्यानें ख्रिस्ताला कोणत्या प्रकारें मरण आलें तें सांगितलें आणि खालील करुणरसपूर्ण गाणें म्हणावयास त्यानें आरंभ केला. बाजाची पेटी सुरू झाली. गाण्यास आरंभ करण्यापूर्वी त्यानें प्रेक्षकांतील एका मुलास जवळ बोलाविलें. पण तो कांकूं करूं लागला. तेव्हां त्यानें स्वतःच सुरुवात केली. बाजाची पेटी सुरू झाली.

क्रूर खांबींचें मरण खिळेही
अनुभविला कुशिं भाला
प्रभु मजसाठीं हो दुःखी बहु झाला
सोशिली छी थू दुःसह फटके
चपडाका किति गाला
प्रभु मजसाठीं हो दुःखी बहु झाला

पुन्हा त्यानें व्याख्यानास सुरुवात केली. लोकांचा जमाव साधारणच होता. त्यांत लहान मुलें आणि खालच्या वर्गांतील अशिक्षित लोकांचा भरणाच फार होता. बरेंचसें लेक्चर झाल्यावर त्या लोकांस देखील कंटाळा आल्यासारखें वाटलें. परंतु तितक्यांतच त्यांनीं ज्याला खुणा केली होती त्या मुलाला जवळ बोलाविलें. त्याबरोबर त्या मुलाकडे सर्वांचें लक्ष्य वेधलें. लवकरच चंद्रोदय होण्याचा रंग दिसत होता. तत्पूर्वी त्यांस आपलें काम आटपावयाचें होतें. कारण चंद्रप्रकाशांत उघड्या जागेंत मॅजिक लँटर्न्‌ची गंमत नसते. सुंदर देखील हळूहळू जाण्याचाच विचार करीत होता. पण त्याला विनायक कोठेंच न दिसल्यामुळें वाईट वाटत होतें. आतां पहातो तों मिशनरी लोकांपैकीं कांहीं जण अत्याग्रहानें विनायकासारख्याच एकास बोलावीत आहेत आणि तो तर नाहीं म्हणत आहे, असें त्यानें पाहिलें. शेवटीं त्याला मिशनऱ्यांची विनंति–विनंति दिसण्यांत पण खरोखरीच पाहतां हुकूम मोडवेना. तो आतां जाणार इतक्यांत सुंदर पुढें आला आणि त्यानें जरा जास्त न्याहाळून पाहिलें; तों तो विनायकच असावा असा त्याचा संशय दृढ झाला. पण एवढ्यांत त्याला व्याख्यात्याकडे नेण्यांत आलें होतें.

लगेच शेवटचें गीत सुरू झालें.

प्रियप्रभू येशू खिस्ता। थारा मिळेना जन्मतां
मालक सृष्टीचा असतां। अरे रे रे रे १
किती विव्हळ तो झाला। घाम रक्ताचा वाहीला
बागीं किती शोक केला। अब ब ब ब २
रक्त त्याचें विकीयेलें। बांधोनीयां त्याला नेलें
सर्व मनुष्यांनीं केलें। थू थू थू थू थू २

हें पद बरेंच मोठें होतें. पण आतां एका लहान मुलानें अति गोड गळ्यांत म्हटलेलें हें गाणें मूळचें कितीही वाईट असलें तरी त्यानें जाणाऱ्या सर्व लोकांस जेथल्या तेथें थांबवून धरिलें. नवीन गायकाचा असा झालेला परिणाम कायम टिकावा म्हणून हिंदूंच्या ईश्वरोपासनेच्या धर्ममार्गांवर हळूच कोणाचीं मनें न दुखतील अशा सौम्य भाषेंत टीका करून खालील पद गाईलें.

तीर्थ यात्रा जप। स्नान दान तप
केल्यानें हें पाप। जात नाहीं १

अरण्यीं प्रवास । गुहेंत निवास
झाडपाला खास । तारी व्यर्थ २

दांगुनी घेतलें । शरीर विंधीलें
उलटें पाप झालें । हत्येचें हें ३

हेंही पद मोठेंच होतें. त्या मुलाचें गाणें सर्वांस फार मोहक वाटलें. आतां मात्र त्याचा स्वर सुंदरनें ओळखला. आणि त्याला अतोनात वाईट वाटलें. त्याला कसा बोलवावा या विचारांत तो होता. त्याला तो हांक मारणार होता. इतक्यांत दुसरें गीत सुरू झालें. ह्या गीतांत हिंदूंच्या मूर्तिपूजेची यथेच्छ निंदा केली होती. त्यांतील एक दोन उतारेच येथें देणें अवश्य आहे.

तथापि आमुचा । स्वर्गलोकीं देव
आहे स्वयमेव । सर्व काल
त्याच्या मूर्ति रुपें । आणिक सुवर्ण
हस्तकर्ण जाण । नरांचें तें

हें गाणें संपणार तोंच "साप, साप" ह्मणून सुंदरनें ओरड केली. त्याबरोबर जिकडे तिकडे एकच गडबड उडाली. सुंदरचा स्वर विनायकानें ओळखला होता म्हणून तो धांवतच सुंदरकडे आला. प्रत्येकजण सुंदरला साप कोठें आहे म्हणून विचारूं लागला. त्यानें मॅजिक लँटर्नच्या वाटेनें, साप गाणाऱ्या मंडळीकडे गेल्याचें सांगितलें. सगळेजण आपापल्या वाटेनें पळत सुटले. परंतु एकाचा पाय पडद्यास लागून, पडदा वरील चित्रासहवर्तमान जमिनीवर पडला. मिशनच्या मंडळींतील बाजाची पेटी वाजविणारा मागच्या पावलांनींच मागें सरकत असतां पाठीमागून दणका लागून उताणाच पडला. पाठीमागच्या खुर्चीवर रेवरंड स्वीटटेग बसले होते. हे वयानें बरेच ह्मातारे होते. त्यांची खुर्ची लवंडली आणि खालीं खुर्ची, त्याच्यावर रेवरंड स्वीटटेग, त्याच्यावर बाजा आणि त्याच्यावर बाजा वाजविणार. असे पडले. बाजाची पेटी बंद झाली, परंतु तिच्या ऐवजीं ह्या दोघांच्या तोंडांचा बाजा सुरू होण्याचा रंग दिसूं लागला. ही धांदल सुरू असतां सुंदरनें विनायकाच्या कानांत कांहीं सांगितलें. त्याबरोबर तो इतका घाबरून गेला, कीं काळोखांत देखील पाहिल्यास त्याचा चेहरा एका क्षणांत पांढरा फटफटीत झालेला दिसला असता.

"लवकर चल, आतां इथें वेळ गमावतां नये. मी नुकताच तुझ्या घराकडून आलों." सुंदरनें म्हटलें.

"चल चल, लवकर. मला या वेळीं यावयास मिळालें नसतें. पण आतां आलेंच पाहिजे. चला" असें विनायकानें म्हणून तो सुंदरच्या पाठोपाठ चालूं लागला.

ते दोघेजण थोड्याशा अंतरावर जातात तोंच मागून त्यांना कोणीशा हांका मारल्या. पण त्यांना उभें राहतां येण्याइतका वेळ नव्हता. तथापि मागून येणारे लोकांनीं धांवून त्यांना गांठलेंच.

"काय सुंदर, तुला साप चावला कीं काय ? तूं तर सारखा जोरांत धांवतो आहेस" गणपतनें म्हटलें.

"अरे हा विनायक कीं काय तुझ्याबरोबर ? आम्ही तुम्हां दोघांनाही शोधून दमलों. आम्ही फार लवकर गेलों होतों. विनायक गात होता, पण सुंदर तूं कोठें होतास ?" हरीनें विचारलें.

"मला जरा यावयासच उशीर लागला. मी एका बाजूलाच बसलों होतों." असें म्हणून तो जोरानें पुन्हा चालूं लागला.

"अरे, जरा थांब तर खरा, तुला कांहीं विचारावयाचें आहे. आज आमच्या अण्णांनीं तुला काय सांगितलें ?"

बिचारा सुंदर ह्या गलेलठ्ठाला घाबरून गेला होता. आतां आणखी नवी ब्याद हे दोघे आपल्यावर कसली आणतात, कोणास ठाऊक असें त्यास वाटत होतें. तो म्हणाला—

"मला अण्णांनीं कांहीं एक सांगितलें नाहीं."

"बरें कांहीं तुला करावयास सांगितलें तरी ?" हरीनें विचारलें.

"अंहं." सुंदरनें मान हलवून उत्तर दिलें.

"खरें बोलतोस हें ?" जरा दरडावून हरीनें पुनः विचारलें.

"पण तुला माझें बोलणें खोटें कां वाटतें हेंच कळत नाहीं. मी मुळींच कधीं खोटें सांगत नाहीं." सुंदरनें उत्तर दिलें.

"आज आमचे अण्णा तुझ्याजवळ कांहीं बोलले नाहींत ? अथवा त्यांनीं तुला कांहीं सांगितलेंही नाहीं म्हणतोस ?" हरी रागानें म्हणाला.

" नाहीं. मुळींच नाहीं. " सुंदरनें चालतां चालतांच उत्तर दिलें.

" अरे ! जरा सावकाश चालना ! " त्याच्या दंडास जोरानें धरून हरी म्हणाला. त्यानें गणूकडे व गोविंदकडे वळून पाहिलें. आणि पुनः सुंदरला म्हणाला—" तुला यापुढें आमच्याकडे माधुकरी मिळणार नाहीं. "

" पण असें अण्णासाहेबांनीं मला सांगितलेलें नाहीं. "

" मी कोण ? मला तूं ओळखतोस ? " चिडून हरीनें विचारलें.

" हो. हो. तूं हरी. अण्णा नव्हेस. अण्णा स्वतः मला सांगतील तोंपर्यंत मी येणारच. "

" उद्यांच्या बुधवारपासून आमचेकडे यायला मिळणार नाहीं. "

"अण्णा सांगतील, तेव्हां मग नाहीं येणार. तोंपर्यंत अलबत् येणार मी. "

" खुद्द अण्णांनींच मला असें तुला बजवावयास सांगितलें आहे. "

" कधीं ? "

" आज. "

" मग मलाच कां नाहीं सांगितलें ? आज मी गेलों होतों. आज रविवार ना ?"

" किती वाजतां ? "

" सुमारें साडेदहांच्या सुमारास. "

हरीनें गणपतीकडे पाहिलें आणि क्षणभर चूप बसला. ते तिघेही चपापून काळजींत पडले. हरीचा क्रोध अधिकच भडकला.

"या मुरलीधराची शपथ घेऊन सांगतों, कीं यापुढें तूं आमच्या घरीं आलास तर तुझी गत बरी होणार नाहीं. अण्णांनीं तुला बंदी केली आहे. "

" बरें आहे. " इतकें बोलून सुंदरनें विनायकाला त्याच्या घरीं पाठविलें व आपण आपल्या घरीं गेला.

प्रकरण चवथें.

हा कोण ? कुठला ?

सोमवारीं प्रत्येक वर्गाच्या मास्तरनीं आपापल्या वर्गातल्या मुलांस रिझल्ट सांगितला. सहाव्या इयत्तेंत पास झालेल्या सुंदरचा नंबर पहिला असून त्यास बक्षिस मिळालें होतें. गोविंद दुसरा आला होता. आणखीही खूप मुलें पास झालीं होतीं. गणू आणि हरी हे नापास झालेल्यांपैकीं होते. जे कोणी नापास झालेले होते त्यांपैकीं

बऱ्याच जणांस लज्जा वाटत होती, कोणास दुःख झालें होतें. विनायकासारख्यास तर आपल्यावर संकट कोसळल्यासारखें होत होतें; आणि त्यामुळें त्याच्या मनांत घोळत असलेला एक विचार अधिकाधिक दृढ होत चालला होता. रिझल्ट सांगून व नंतर परीक्षेची रजा देऊन शाळा सुटणार होती. पण तितक्यांतच हेडमास्तरकडून कांहीं मुलांस बोलावणें आलें. त्यांत मुख्यत्वेंकरून गोविंद, विनायक, हरी, गणपत व सुंदर यांचींच नांवें प्रथम होतीं. आपणाला कशाला बोलावलें असेल याबद्दल त्यांची कांहीं अटकळ होईना. मुकाट्यानें ते हेडमास्तरसमोर जाऊन उभे राहिले. हेडमास्तर साहेबांच्या हातांत एक पत्र होतें. त्या पत्राकडे ते मधून मधून पहात असत. त्यांच्यासमोर दामू अगोदरच भीतिग्रस्त अंतःकरणानें कांपत असलेला उभा होता. त्याला पाहिल्याबरोबर मात्र त्यांच्या डोक्यांत साधारण प्रकाश पडला.

कोपानें लाल झालेले थोरले मास्तर दामूला म्हणाले—

"बोल, इतकेच का आणखी कोणी आहेत, तुमच्या कंपूंत ?"

"इतकेच." मधून मधून, लाल झालेल्या हाताची मूठ वळून तोंडाकडे नेत असतां दामू म्हणाला. त्याचा रडण्याचा पहिला ओघ किंचित् ओसरला होता. पण डोळ्यांत उगम पावून गालांच्या पाठारांवरून खालीं वहात जाणारे पाणलोट अद्याप पुरेसे वाळले नव्हते.

"हं; बोला हरी भाऊ, काल आपण बाजारांत काय करामत केलीत ?"

"नाहीं सर मी—मी—गणू बरो—" हेड मास्तरांनीं जमदग्नीचा अवतार धारण केलेला पाहून हरीचें धाबें दणाणलें. काय सांगावें हें त्याला सुचेना.

"काय गणपत, काल काय पराक्रम गाजवलांत रे चोरांनों ?"

गणपतनें विचार केला, कीं प्रसंगीं धीर सोडून उपयोगाचें नाहीं. बेतलें खरें. तर आतां घाबरून जाऊन काय उपयोग ? तो म्हणाला.

"मी सर, कांहीं केलें नाहीं. हरी आणि गोविंद यांच्या बरोबर मी गेलों, एवढीच माझी चूक."

"आणि बुकें कोणी विकत घेतलीं ?"

"हरीनें."

"काय ?" हरीनें गणपतकडे पाहून विचारलें. "बुकें मी नाहीं घेतलीं सर. गोविंदनें घ्यायला सांगितलीं, आणि गणूनें तीं घेतलीं. मी फक्त पैसे दिले.

" आणि पुढचें काम कोणी केलें ?" हेडमास्तरांनीं विचारलें.

" तें सगळें गणूनेंच." हरी म्हणाला.

" नाहीं सर, हा खोटें बोलतो. मी फक्त आगपेटीवर काडी पेटवून दिली आणि पुस्तकांचा ढीग रचून तीं जाळलीं हरीनेंच." गणू म्हणाला.

"मिळून तुह्मी दोघांनींच हा सर्व धंदा केला ना ?" हेड मास्तरांनीं विचारलें.

हें ऐकून हरीला व गणूला दोघांनाही वाईट वाटलें. सगळा भार आपल्यावरच पडून सुंदर व गोविंद फुकट सुटतात असें त्यांस वाटलें. या विचारांत मात्र त्यांच्या मनाची एकवाक्यता झाली.

" आह्मी दोघांनीं हें सर्व केलें खरें, पण आह्मांला गोविंदानें आणि सुंदरनें हें सर्व करावयास सांगितलें" गणू ह्मणाला.

"होय सर. मी सांगूं ? आह्मी तर, एक वेळ असें करणें बरें नव्हे असें म्हणून परतणार होतों. पण गोविंदच ह्मणाला, कीं असलीं घाणेरडीं पुस्तकें अशींच जाळून टाकावींत ह्मणून. सुंदरनें आणि दामूनेंही तसेंच सांगितलें. ह्मणून आम्ही मग त्यांचें ऐकलें" हरी ह्मणाला.

" नाहीं. हे दोघेही खोटें बोलतात. मी ह्यांच्या मसलतींत मुळींच नव्हतों. सर्व कांहीं यांनीं केलें. मी तेथें तिऱ्हाइतासारखा उभा होतों. आणि सुंदरही माझ्याप्रमाणें उभा होता." गोविंद म्हणाला.

" हें पहा, खोटें बोलण्यांत हंशील नाहीं. तें आतां मुळींच रुचणार नाहीं. ह्या पत्रावरून आणि दामूच्या सांगण्यावरून मला सगळें कांहीं कळून चुकलें आहे. चल, गणपत ये असा पुढें."

पण दामू तरी मग कसा सुटतो ? "दामूनें देखील दोन पैशांचीं दोन पुस्तकें घेतलीं होतीं. मी अधिक घेतलीं खरीं, पण त्यानें देखील घेतलीं होतीं. " हरी म्हणाला.

"मूर्खांनों, शाळेची शिस्त बिघडवलीत, आणि लोकांच्या कागाळ्या आणल्यात, याबद्दल तुम्हांला शिक्षा झालीच पाहिजे." हातांतील काठी वर उचलली व हेडमास्तर म्हणाले, दामूला प्रायश्चित्त मिळालेंच आहे. हं ये गणू. आतां सुटणार नाहीं. असा उनाडपणा आजपासून करावयाचा नाहीं. धर, कर हात पुढें. एक, दोन, तीन—" चल, जा."

गणू हात चोळीत व डोळे पुशीत गेला. नंतर हरीचा नंबर लागला.

" या तुह्मी आतां हरीभाऊ. घ्या–एक–दोन–तीन–चला, आजपासून अशी दांडगाई करायची नाहीं."

" गोविंदा, तुला मारण्याला माझ्या जिवावर येतें. पण तूं त्या पाद्र्यांची पुस्तकें जाळण्यास यांना कां मसलत दिलीस ? वर्गांतला तूं हुषार मुलगा ना ? यांच्याबरोबर वाईट कामांत तूं शिरायचें, कीं त्यांना वाईटापासून मागें ओढायचें, सांग बरं ?" हेडमास्तरांनीं विचारलें.

" ते पाद्री लोक चमत्कारिक भाषेंत लिहिलेलीं ती पुस्तकें घेऊन, आकाशांतल्या बापाचें ऐका; तुमचा आकाशांतला बाप, तुह्मांला आपल्याकडे बोलावतो आहे वगैरे सांगत फिरतात. आह्मांला तें नाहीं आवडलें. विनायकाला तें आवडलें म्हणून तो त्यांतून सुटला. परंतु आह्मांला तें आवडलें नाहीं. आणि हें कबूल करावयास पण आह्मी भीत नाहीं." गोविंदानें उत्तर दिलें.

" जर आवडत नाहीं, तर आपण ऐकूं नये, आपण तिकडे लक्षच देऊं नये. उगीच त्यांचीं बुकें विकत घेऊन तीं जाळून टाकण्याचें कारण नव्हतें. हं घे, एक—"

गोविंदाला एक तरी काठी मिळाली हें पाहून हरीस व गणूस समाधान वाटलें.

"विनू, तूं आतां सर्व हकीकत सांग पाहूं, तुझें यांत कांहीं अंग आहे काय ?"

"मला पुस्तकें वगैरे मिळत नाहींत, हें त्या पाद्र्यांना कसें समजलें कुणास ठाऊक ? पण प्रथम पासूनच त्यांनीं कुठून तरी माझी माहिती काढून ते मला मदत करूं लागले. मला फी जरी माफ आहे, तरी एरव्हींचा बाकीचा सर्व खर्च मला तेच देतात. प्रथम प्रथम मला त्यांनीं शाळेंतल्या अभ्यासाचीं पुस्तकें दिलीं. नंतर येशूख्रिस्ताचीं कसलीं तरी पुस्तकें मला देऊं लागले. मी तीं आणून ठेवीत असें, वाचीत नसें. पण तीं वाचण्यासाठीं मला त्यांनीं सारखा आग्रह केला. तेव्हां मी वाचूं लागलों. मला तीं खरोखर आवडत नाहींत. पण मला इतर मदत ते करतात, म्हणून मी तीं वाचतों व ते सांगतात त्याप्रमाणें करतों. माझ्यासारख्या इतर गरीब मुलांस तसेंच करावयास सांगून त्यांचें मन वळविण्यास ते मला सांगतात. माझ्या मनांत नसलें तरी मला त्यांच्या सांगण्याप्रमाणें वागणें भाग पडतें. कालच एक 'शुभवर्तमान' नांवाचें पुस्तक मी दामूला दिलें होतें, तें त्यांच्याकडचेंच. सुंदरची त्यांना माहिती आहे. माझ्याकडूनही

थोडीशी त्यांनीं काढून घेतली. मी त्यांची समजूत घालण्यापुरता तरी माझ्या गरीब स्नेह्यांस पुस्तकें वाचावयास देतों. ह्यांत सर माझी काय चूक ?"

"बरें आहे. सुंदर ! ह्यांनीं जरी तुझ्यावर आरोप घातला आहे, तरी तुझा कांहीं दोष नाहीं. अशी माझी खात्री झाली आहे. पण विनायकानें सांगितलेली गोष्ट सर्व खरी आहे काय ?" हेडमास्तरांनीं विचारिलें.

"हो, विनूनें सांगितलें तें सर्व खरें आहे. पण त्यानें तसें करूं नये असें मला वाटलें, ह्मणून मी रात्रीं मॅजिक लँटर्नच्या वेळीं पाह्यांनीं विनूस गावयास बोलावला तेव्हां उगीच साप आल्याचें निमित्त करून विनूस आमच्या घरीं घेऊन गेलों, व नंतर त्यास त्याच्या घरीं पाठविलें. तो जावयास कबूल नव्हता, पण त्याची आई एकाएकीं आजारी पडल्याचें कानांत सांगितलें तेव्हांच तो मजबरोबर आला. विनूनें मला पाह्यांच्या सांगण्यावरून आग्रहानें बोलावलें होतें. मला हें ठाऊक नव्हतें. मागून विनूनेंच सर्व सांगितलें. मीं त्याला पुष्कळ सांगितलें, पण त्याला पाहिजे ती मदत त्यांच्याकडून जर मिळते तर त्यानें त्यांचें ऐकल्याशिवाय कसें चालेल ? " सुंदर म्हणाला.

"शाबास सुंदर, तूं पहिला नंबर आलास म्हणून तुला बक्षिस मिळालेलें आहेच. यापुढें तुला आणखी जी कांहीं थोडीबहुत मदत लागेल ती मला सांग, मी देईन. आणि विनूबद्दलचाही विचार करीन. चला, जा."

शाळा लवकर सुटली. मुलें बहुतेक निघून गेलीं होतीं. हरी आणि गणू यांच्या आंगाचा तिळपापड होत होता. गणू सारखे दोन्ही तळहात एकमेकांवर चोळीत होता. अजूनपर्यंत मास्तरच्या काठीनें त्याचे हात दुखत नव्हते, तर सुंदरचें पारिपत्य कसें करावें याजबद्दलच्या त्वेषानें तो तसें करीत होता. त्यांनीं आपापसांत देखील एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढल्यामुळें सगळेच एकमेकांबरोबर बोलल्याशिवाय बाहेर पडले. प्रत्येकाला दुसऱ्याचा राग येत होता. पण सगळ्यांना मिळून एकट्या सुंदरचा फारच राग येत होता. विनायकाला मात्र सुंदरचा राग आला नव्हता. सुंदरच्या खालोखाल त्यांना दामूचा राग येत होता. कारण दामूनें सर्व बेंड बाहेर फोडलें अशी त्यांची समजूत होती. सर्वांस आज योग्य बक्षीस मिळालें होतें.

मुलें बाहेर पडून गेल्यावर शाळेचें काम आटोपून मास्तर देखील बाहेर पडले. वाटेंत जातां जातां हेड मास्तरांस अण्णासाहेब भेटले. इकडच्या तिक-

डच्या गोष्टी झाल्यावर शाळेविषयीं गप्पा निघाल्या. थोरल्या मास्तरांनीं बोलतां बोलतां मिशनऱ्यांच्या पुस्तकांची मुलांनीं केलेली होळी आणि त्यांच्याकडून आलेली तक्रार वगैरे गोष्टीही सांगितल्या. त्यांत आपल्या हिंदूंपैकीं, गरीब परंतु पुढें चांगलीं निपजण्याचा संभव असणाऱ्या मुलांकडे समाजाचें दुर्लक्ष झाल्यामुळें त्याचा कसा उलट परिणाम होत आहे, याचाही त्यांनीं निर्देश केला. विनू लवकरच बाटण्याचा संभव आहे, असें जेव्हां ते म्हणाले, तेव्हां अण्णासाहेबांस फारच आश्चर्य वाटलें.

" विनू म्हणजे कुठला हो मुलगा तो ? " त्यांनीं विचारलें.

" तो एका गरीब विधवेचा मुलगा आहे. जातीचा कुंभार. त्याला कोणाचाच आधार नाहीं. सुंदरची स्थिति तुम्हांला ठाऊक आहेच. पण तो जातीचा ब्राम्हण असल्यामुळें त्याला कुठें एकादा वार तरी मिळतो. ह्याला आजपर्यंत मिशनऱ्यांनींच मदत केली असून आतां त्याकरितां त्याला बाटावें लागणार आहे."

" हें अगदींच वाईट." अण्णासाहेब ह्मणाले.

" वाईट तर खरेंच, पण त्याला उपाय काय आहे ? आपला हिंदूसमाज असाच आंतून पोखरला जात आहे, तिकडे लक्ष आहे कोणाचें ? गरीब स्वतःच्या व्यवसायांत दंग ! श्रीमंत श्रीमंतींतच गुंग. अनाथाची चौकशी करण्यास फुरसत आहे कुणाला ?"

" मास्तरसाहेब, तुह्मी म्हणतां हें खरें आहे. आमची तशी स्थिती झाली आहे खरी. पण त्यांत आमचें शिक्षणच असें आहे, कीं त्यापासून स्वधर्म, स्वदेश, नीति यांचे पाठ मुलांस लहानपणींच मिळावे तसे मिळत नाहींत. हें देखील विसरून चालणार नाहीं." अण्णासाहेब म्हणाले.

" तें कितीही खरें असो. पण दुसऱ्याला दूषण देण्यापूर्वी आपण स्वतःकडे पाहिलें पाहिजे. आह्मी स्वतःच आपली स्वतःची पूर्वपरंपरा विसरत चाललों आहोंत. घरांतील वडील माणसांची मुलांच्या वर्तनावर नजर असते का ? शाळेंत मुलाला घातलें, कीं आपणावरची जबाबदारी संपली; हेंच तुमचें पालकांचें मत नाहीं का ? मी विचारतों म्हणून नुसतें हूं हूं ह्मणूं नका. खोटें असलें तर माझें ह्मणणें चूक ह्मणून सांगा. घरांत रोज आन्हिक कर्म, स्नानसंध्या, देवपूजा, ईश्वरनामस्मरण; आपलीं जुनीं पुराणें, पोथ्या, यांचें वाचन; पहाटेस भूपाळ्या ह्मणणें, स्नान झाल्यानंतर स्तोत्रें म्हणणें वगैरे सर्व कांहीं सुटत चाललें.

शहरांत जरी हें सर्व चालण्यासारखें नाहीं, तरी दिवसांतून, आठवड्यांतून एक दिवस तरी मुलांस कांहींना कांहीं धर्मशिक्षण दिलें पाहिजे. नाहींतर त्यांना आपले-पणाची आठवण रहावी कशी ? आतां तुह्मी मिशनऱ्यांना दोष द्याल. पण त्यांना दोष देणें देखील वाजवी होणार नाहीं. कारण जे स्वधर्माच्या प्रसाराकरितां झटणार, ते दुसऱ्या धर्मापेक्षां आपला धर्म श्रेष्ठ म्हणून सांगणारच. अर्थात् ते परधर्मासहिष्णु असणार. क्रमिक पुस्तकांत अथवा शाळेंत शिकवली जाणारी ही पोपटा अर्थवा कवाइती नीति! शिवाय कित्येक संस्थांत जें वास्तविक नको असेंच धर्मशिक्षण दिलें जातें. पण त्यासंबंधानें ओरड तरी कशाला करावयाची ? विद्यार्थ्यांना स्वतःच विचार करण्यास न शिकवितां त्यांच्यामध्यें मानसिक दारिद्र्य उत्पन्न करण्याच्या कांहीं शाळाच असतात. कवाइती नीतीनें नैतिक दारिद्र्य उत्पन्न होतें. गरीब बिचाऱ्या मुलांमुलींच्या मनावर विशिष्ट प्रकारच्या धर्मसमजुती लादल्यानें आध्यात्मिक दारिद्र्य उत्पन्न होतें. आध्यात्मिक दारिद्र्य आणि दुसऱ्याच्या धर्मास कमी लेखणें व तसा उपदेश करणें या एकाच रोगाच्या निष्क्रिय आणि कर्मशील अशा दोन बाजू आहेत."

"बरें तर मग असें विचारतों, कीं सुंदर कसा अजून बाटला नाहीं ? त्याला कुठें पालक आहेत ? बिचाऱ्याची एकटी विधवा आई आणि तो."

"त्याचें देखील कारण आहे. विनायक देखील बाटण्यास तयार झाला नसता. पण सुंदरच्यासारखी त्याची आई पाहिजे होती. त्याला नवीन शिक्षण सुरू झालें नाहीं. जुनें शिक्षण–कौटुंबिक शिक्षण–होतें तें नाहींसें झालें. सुंदरची आई जुन्या वळणांतली असल्यामुळें ती त्याच्याकडून नित्य नैमित्तिक कर्म मूळपासूनच करून घेते. रात्रीं तो पोथी वाचतो. त्याच्याकडून वाचून घेऊन ऐकल्याशिवाय ती निजणारच नाहीं. सकाळीं उठल्यावर तो रोज देवाची पूजा करतो. शिवाय त्याला तुमच्यासारख्याचा थोडा तरी आश्रय असल्यामुळें एकादा वार तरी मिळतो. विनायकास तो कनिष्ठ जातींत पडल्यामुळें यापैकीं एकाचाही फायदा मिळत नाहीं. त्याला धार्मिक शिक्षणाचा देखील फायदा मिळत नाहीं. या साऱ्या सामाजिक गोष्टी आहेत, आणि त्यांच्यावर वाद करावा तेवढा थोडाच होईल. तुमचेंही घर आलेंच. आतां तुह्मी दुकानांतून आलां काय ?"

"होय. विनूला व त्याच्यासारख्या सर्वच गरीब मुलांना कांहीं तरी मदत करण्याचा आपण सर्वांनींच विचार केला पाहिजे. माझ्या मनांत हे विचार हल्लीं

वारंवार येऊं लागले आहेत. तोंपर्यंत दादासाहेबांच्या आफिसांत सुंदरला ठेवायाचें माझ्या मनांत आहे."

"असें कांहीं मनावर घ्या. आपल्या समाजांतल्या गरीब विद्यार्थ्यांची काळजी सुखी असलेल्या आपणांसारख्या माणसांनीं घ्यायची नाहीं, तर कोणी मिशनऱ्यांनीं घ्यायची ?" हेडमास्तर म्हणाले.

"ते तर यथाशक्ति घेतातच आहेत !" अण्णासाहेब आपल्या घराच्या कंपाऊंडांत जात असतां हंसत हंसत म्हणाले.

हेडमास्तर पुढें गेले.

शाळेंतील मुलें सुटलीं म्हणून वर सांगितलेंच आहे. बाकी सर्वांची संगत सोडून सुंदर सरळ आपल्या घराकडे आला. पहातो तर आपली आई बाहेरच दरवाजांत उभी असून कोणाशीं तरी बोलत असलेली त्यानें पाहिली. दाराच्या बाहेर एक विचित्र पोषाख केलेला पुरुष होता. तो तिला कांहीं देत होता आणि ती नको म्हणत होती. सुंदरला त्याला पाहून मोठें आश्चर्य वाटलें. थोडें जवळ गेल्यावर त्या इसमाला आपण कुठें तरी, केव्हां तरी पाहिलेंही असावें; असें त्याला वाटलें. पण कुठें आणि केव्हां हें त्याला नक्की आठवेना. तो मनांत म्हणाला. "हा कोण बुवा आणि 'कुठला ?'"

प्रकरण पांचवें.

नोट कोणाची ?

"आई ! तूं नैवेद्य ठेवायला विसरलीस ग. कांहींतरी दे पाहूं !"

"कांहींतरी देतें. पण कशांतून देऊं ?"

"कशांतूनही दे, पण उशीर लावूं नको. तुला ठाऊक आहे ना ?" सुंदर म्हणाला "पूजा झाल्यानंतर नैवेद्याला जर उशीर झाला तर महादेवाला फार राग येतो तें ?"

"पण महादेवाला काय कळत नाहीं ? देण्याकरितांच कांहींतरी मी शोधतें आहें. श्रीकराची पूजा त्याला कशी मानली ? बाळ सुंदर, तुझी पूजा देखील त्याला

तशीच मानवेल बरं ! हं हा घे नैवेद्य !" असें म्हणून तिनें दोन दिवसांपूर्वी फोडलेल्या नारळाच्या खोबऱ्याचा एक लहानसा तुकडा, तिला शोधतां शोधतां सांपडलेल्या एका कागदाच्या तुकड्यावर दिला. सुंदरनें महादेवास नैवेद्य अर्पण केला; उदबत्ती पेटविलेली होतीच. एका खापरींतून–खापरीसारख्याच फुटक्या पणतींतून–थोड्याशा तुपांत भिजविलेल्या कापसाच्या वाती पेटवून त्यानें सांबास आरत ओंवाळली; आणि नंतर उठून प्रदक्षिणा घालून व नमस्कार करून तो ध्यान लावून बसला.

तो ध्यान कसलें लावणार ? त्याला समाधि लावतां येत नव्हती. तो योग-साधन शिकला नव्हता. किंवा एकत्र जमून स्त्रिया–पुरुष जशी निर्गुण निराकार ईश्वराची उपासना करितात, तसेंही त्याला करतां येत नव्हतें. एकदम निर्गुणाची उपासना करण्याइतक्या विसाव्या शतकांतल्या परमहंस कोटींत तो अद्याप शिरला नव्हता. त्याची शिवलीलेची पोथी हेंच त्याचें ब्रम्हज्ञान आणि त्या पोथीवरील श्रीशकंराचें चित्र हीच त्याची आराध्य मूर्ती. त्याच मूर्तीची तो मनोभावेंकरून नित्य उपासना करी. ती उपासना तो आपलें कर्तव्य म्हणून करी. परंतु हें आपलें कर्तव्य म्हणून आपण करतों ही देखील त्याला जाणीव नव्हती. श्वासोच्छ्वास करणें, भूक लागली कीं खाणें, वगैरे जीवनास आवश्यक अशीं कृत्यें जशीं सहजासहजीं मनुष्याकडून आपोआप नकळत घडतात, तसेंच देवपूजेचें कार्य त्याच्याकडून रोज आपोआप घडे. त्यानें मोबदल्याकरितां देवाची उपासना 'मी उपासना करीत आहें.' अशा भावनेनें मांडली नव्हती. त्यानें परीक्षेच्या सुमारास "देवा तूं मला पास कर, मी तुला पांचशेर साखर देईन !" असा कधीं नवस केला नाहीं. तें एक त्याचें रोजचें कामच बनलें होतें. स्नान, संध्या आणि देवपूजा हीं एकामागून एक त्याच्या हातून आपोआप घडत. त्यानें—

> गंगा प्रवाहजचलज्जलसेकरम्यम्
> चंद्रस्[illegible]रती प्रगुणितप्रभ केशभारम् ।
> भस्म[illegible]न विधेर्धवलायमान-
> मापादमस्तकमहं प्रणतोऽस्मि शंभुम् " ॥ १ ॥

अशा शब्दांनीं ध्यान करून त्यानें मन एकाग्र केलें आणि तो परमेश्वराच्या मूर्तीशीं तन्मय होऊन कांहीं वेळ बसला.

तदनंतर त्यानें नेहमींप्रमाणें शिवलीलेचा अध्याय वाचला, आणि पोथी ज्यावर ठेवली होती तो पाट उचलून ठेवून शिवस्तुती म्हणण्यास आरंभ केला.

कैलास राणा शिव चंद्रमौळी
फणींद्रमाथां मुकुटीं झळाळी
कारुण्यसिंधो भवदुःखहारी
तुजवीण शंभो मज कोण तारी ? ॥ १ ॥

हे श्लोक ह्मणतांना त्याचा गळा दाटून आला होता. त्यानें जवळ घेतलेल्या बहुतेक सर्व वस्तु उचलून ठेवल्या; आणि इकडे तिकडे येरझारा घालीत तो शिवस्तुतीचा पाठ म्हणत असतां रमाबाई म्हणाल्या—

"आज काय अधिकसें लांबलें पुरश्चरण ? जायचें नाहीं का बाळ बाहेर तुला ? अकरा वाजायला आले."

"नंदीहराचा हर नंदिकेश" हा श्लोक म्हणत असतां आईच्या प्रश्नास उत्तर न देतां त्यानें नुसती मानच हालविली. त्या श्लोकांच्या पाठांत गुंगून गेल्यामुळें येरझारा घालीत असता त्याचा पाय एका कागदाच्या तुकड्यावर पडला. तें पाहून रमाबाई म्हणाल्या, "सुंदर तूं स्तुति म्हणत आहेस. म्हणून मध्यंतरीं मी अडथळा करणें बरें नव्हे हें खरें. पण लक्षांत घेण्याच्या गोष्टी जेव्हांच्या तेव्हां लक्षांत आणून दिल्या म्हणजे बरें असतें. त्याच वेळीं त्या मनावर ठसतात. मघांशीं नैवेद्य द्यायला माझ्यापाशीं कांहीं नव्हतें ह्मणून एका कागदाच्या तुकड्यावर ठेवून मी तुला नैवेद्य दिला. त्याच तुकड्यावर आतां तूं पाय दिलास. नव्हे तुझा पाय पडला. तोच तुकडा उद्यां नसता का उपयोगी पडला. तो उचलून ठेवावा कीं नाहीं, सांग बरं. बाकीच्या सगळ्या जिनसा तूं उचलल्यास, तेवढा कागदच कसा विसरलास? अगदीं हलक्या दिसणाऱ्या जिनसांपासून देखील वेळेवर अडून राहतें. हें नेहमीं लक्षांत ठेवलं पाहिजे."

रमाबाई एवढें बोलून आपल्या कामास लागल्या, नव्हे काम करीत असतांच त्या बोलत होत्या. शिवस्तुतीचा पाठ संपत आला, शेवटचाच श्लोक सुंदर म्हणत होता. आईचें बोलणें संपतांच त्यास उत्तर देखील न देतां तो खालीं वांकला आणि त्यानें तो कागद उचलला. कागद उलटतो तर काय ? ती पांच रुपयांची नोट ! सुंदरला आश्चर्य वाटलें ? त्यानें आपला पाठ संपतांच एकदम म्हटलें.

" आई हें ग काय ?" असें म्हणून त्यानें तो कागद आपल्या आईच्या समोर नेला.

" नोटीसारखा दिसतो नाहीं रे हा कागद ?" रमाबाई म्हणाल्या.

" अग होय. ही पांच रुपयांची नोट. तुला कुठें ही सांपडली ?"

" मला बाबा नाहीं सांपडली."

" तर कोणी तुला दिली ?"

" मला पांच रुपयांची नोट कोण कशाला देईल ?"

" तर तुझ्याकडे कशी आली ?"

" माझ्याकडे कुठें आली ? तुलाच सांपडलीना आतां ती ?"

" मला सांपडली कुठें ? तूं जो आतां मला कागदाचा कपटा उचलून ठेवायला सांगितलास तोच हा कपटा ! "

" मग मला नाहीं कशी दिसली ती नोट. मीच तुला दिला ना तो कागद !"

"मी तुला तेंच विचारतों" सुंदर घड्या पडलेल्या त्या नोटीकडे पहात म्हणाला. "हं आतां समजलों. ह्या कागदाची अगोदरच घडी केलेली होती, आणि त्यावर आणखी तूंही नैवेद्य ठेवतांना तो दुमडून घडी करूनच ठेविला होतास. कामाच्या गर्दीत त्या घड्या न उघडतां तूं त्याच्यावर नैवद्य ठेवूनच पुढें केलास तो कागद !"

" होय रे हो. अगदीं तसंच झालं खरं ! पण त्या कागदाची नोट कशी बनली !"

" तोच तर चमत्कार मला कळत नाहीं. नोट बनणार कसली ? ती मुळचीच नोट होती, पण ती आपल्याकडे कशी आली ?"

" त्या देवालाच ठाऊक ! मला कांहीं माहीत नाहीं. मला मोठं नवल वाटतंय् या गोष्टीचं. त्या देवाचीच करणी असेल."

"कांहीं तरी म्हणतेस तूं आई ? ही नोट आम्हांला सांपडली ही काय देवाची करणी झाली ? आम्हांलाच कशी आली हें कळत नाहीं झालं. "

"देवाची करणी कां बरं असणार नाहीं. श्रीकराच्या पूजेनें देव संतुष्ट झाला, तेव्हां कसा बरं चमत्कार झाला ? "

" तें सारं खरं आई. पण तें चमत्काराचें कृतयुग, त्रेतायुग, द्वापारयुग मागं पडलं! आणि आतां हें कलियुग चालू आहे; हें तूं अगदींच विसरलीस वाटतं ? शिवाय कलियुगांत देखील कांहीं अंशीं चमत्कार घडतील, पण

आमची पापी लोकांची ईश्वराच्या ठिकाणीं इतकी भक्ति आणि इतकें प्रेम आहे काय ? बरं तेंही आहे असें मानलं, तर मग देव जो चमत्कार करावयाचा तो करून कागदाची पांचच रुपयांची नोट कां करील ? श्रीकराच्या आईच्या वैभवासारखं त्याला तुझं वैभव एकदम वाढवायला जड का पडत होतं ?''

रमाबाई यावर निरुत्तर झाल्या. सुंदरनें म्हटलेला प्रत्येक शब्द अगदीं खरा होता. त्या तोंडांत बोट घालून विचार करीत तशाच उभ्या राहिल्या. परंतु ती नोट कुठून कशी आली असावी, याचा कांहीं त्यांना अंदाज होईना. शेवटीं त्या म्हणाल्या-'' माझ्याकडून नाहीं, ही तुझ्याकडूनच कुठून तरी आली असेल. नीट आठवण करून बघ.''

'' मी मघांपासून आठवण करतों आहें, पण मला कांहीं आठवत नाहीं.''

'' मग तिचं काय करणार ?''

'' करायचं काय ? खर्च न करतां तशीच जपून ठेवावी. कोणाची असेल तो घेऊन जाईल. मालकाचा तपास लागेल तेव्हां द्यावयास मिळेल. नाहींतर राहील तशीच पडून.''

'' आज तुला जायचं नाहीं का ?''

''विसरतेस कितीदां तरी तूं ? आजचा वार अण्णासाहेबांच्या घरचा. अण्णासाहेबांनीं नाहीं, पण त्यांच्या हरीनें मला गेल्या बुधवारपासून येऊं नको म्हणून सांगितलं. कालच्या बुधवारींच तुला मी हें सगळं सांगितलं होतं. तूं आपली विसरलीस पुन्हां. अण्णासाहेबांच्या घरीं मी जात नाहीं, यांत माझी चूक आहे हें मला ठाऊक आहे. कारण प्रत्यक्ष अण्णासाहेबांनीं कांहीं, मला नको म्हणून सांगितलं नाहीं. पण मला त्या हरीची हल्लीं भीतीच वाटूं लागली आहे. तो माझ्या आंगावर आला तर त्याला मी म्हणजे बधेनच अशी जरी गोष्ट नाहीं तरी तें चांडाळ त्रिकूट काय करील याचा नेम नाहीं. पण हा कोण विनायक येतो आहे वाटतं. हा कां ह्या वेळीं इकडे येतो आहे बरं ?''

'' मला वाटतं तूं जायचं उगीच बंद केलंस ! अण्णासाहेबांनीं स्वतः कांहीं तुला येऊं नको म्हणून सांगितलं नव्हतं. ''

'' होय, पण मी कालच्या बुधवारीं गेलों नाहीं ना ? तर मग त्यांनीं माझी चौकशी—विचारपूस तरी करायची होती, ती देखील केली नाहीं. तेव्हां मला वाटलं, त्यांनींच हरीला मला सांगावयाला सांगितलं असेल म्हणून अण्णासाहे-

बांच्या सांगण्याशिवाय का त्यानें मला इतकें जोरानें दरडावून सांगितलें ? मला मात्र अण्णासाहेबांचा कोणत्याच प्रकारचा अन्याय केलेला आठवत नाहीं. "

" कोणाचं कांहीं करावं लागत नाहीं " रमाबाई सचिंतपणानें म्हणाल्या. " दैव फिरल्यावर कोणाचं कांहीं करावं लागत नाहीं. नको त्या सर्व गोष्टी आपोआप घडून येतात. "

"काय विनू ? कुणीकडे तूं इकडे दुपारचा ?" इतक्यांत येऊन पोंचलेल्या विनायकास सुंदरनें विचारलें.

" एरवींच. तुझं अझून जेवण झालं नाहीं वाटतं ? "

" नाहीं. मला वाटलं मागच्यासारखेंच कांहींतरी असेल, पण आज कांहीं तुझें कसलेंच पुस्तक मीं घेतलेलें नाहीं. "

इतक्यांत त्यांच्या मागच्या बाजूस कोणीतरी कुजबुजून बोलल्याचा भास झाला. पण त्यांना तो भासच वाटला.

" किती वेळ सुंदर मला आतां हिणवणार आहेस तूं ? मी तुला सगळी हकीगत सांगून मोकळा देखील झालों. तुझी क्षमा मागितली. तरी तूं आपल्या मनांतून कांहीं ती गोष्ट घालविलीस नाहीं ! " विनू म्हणाला.

" छे. छे. तुला लागण्याकरितां म्हणून कांहीं मी मुद्दाम ह्मणालों नाहीं. मला आपली ती गोष्ट आठवली म्हणून सहज बोललों. तूं लावून घेऊं नकोस. मी आतांपासून पुन्हा कांहीं बोलणार नाहीं. पण कायरे हल्लीं कांहीं विशेष ?"

" विशेष काय असणार ?" विनायक हळू पुटपुटत म्हणूं लागला. त्या तिघांचेही नेहमींच कसले तरी बेत चालत असतात. त्या दिवशीं शाळेंत सगळ्यांस शिक्षा झाली आणि त्यांतून तूं सुटलास. तेव्हांपासून ते पूर्वीपेक्षां देखील तुझा द्वेष जास्त करीत असतात."

" पण गोविंद कांहीं माझ्या विरुद्ध कटांत बहुतकरून असत नाहीं. नाहीं रे ?"

"तोच तर त्यांचा म्होरक्या; पण पक्का वस्ताद. आड राहून गोळी मारील. सर्व कृत्यें आपणच करवितो, पण बाजूस राहून. हीच तर त्याची खुबी."

" लागोत बापडे. माझ्या मागें लागून त्यांचें तरी कसलें तें कोटकल्याण होवो. बरं मी जेऊन येतों. जरा बस हं."

असें म्हणून सुंदर जेवावयास गेला व थोड्या वेळानें बाहेर आला. त्यानें विनायकास विचारलें.

" तुला पुस्तकें सगळीं मिळालीं असतीलच !"

" नाहींत अजून." विनायक म्हणाला.

" कां नाहीं ?" सुंदरनें प्रश्न केला.

" कशीं मिळणार ?"

" मिशनऱ्यांकडून."

" पण मी त्यांना ह्या खेपेस तीं नको म्हटलीं. बाकी माझें नको म्हणून चालणार नाहीं. तूं मला टोमणा मारण्याकरितां म्हणत आहेस हें मला समजतें. पण मी काय करूं रे ? शेवटीं मला त्यांचेकडूनच घ्यावीं लागणार. हल्लीं त्या मॅजिक लँटर्नच्या दिवसापासून माझा त्यांना संशय येऊं लागला आहे. आणि आतां बाटल्यावांचून ते मला पैची देखील मदत करणार नाहींत. आईनें काबाडकष्ट केले म्हणून तिला काय मिळणार ? मिळालेला शेर अच्छेर दाणा रोजचा खाण्यासच पुरत नाहीं. शेवटीं मला बाटावेंच लागणार !" खिन्नपणें विनायक म्हणाला.

सुंदरचा चेहरा हे शब्द ऐकून भारी खिन्न झाला. तो म्हणाला, तुला मला कांहीं सांगायचं आहे. ज्या दिवशीं आपण शाळेंतून रिझल्ट ऐकून सुटलों, त्याचदिवशीं सकाळीं आमच्या घरीं एक माणूस आला. तो माझ्या आईबरोबर बोलत होता. तें सगळें कांहीं मी तुला सांगत नाहीं. त्याची बोलण्याची वगैरे पद्धत सर्व कांहीं निराळें. तो आमच्याविषयीं सहानुभूति दाखवीत होता. केवळ कळवळ्यानें त्यानें मला पुस्तकें देऊं केलीं व थोडीशी जरूरी पुरती मदतही करीन म्हणाला.

" बरं मग पुढें ? " विनायकानें विचारलें.

" मी कांहीं ती घेतली नाहीं. " सुंदरनें जबाब दिला.

" मग ? "

" मग काय तो गेला, पण तो मिशनऱ्यांपैकींच कोणी तरी आपल्या जाळ्यांत अडकविण्याकरितां आला असावासें वाटतें. " सुंदर म्हणाला.

" त्यांचाच तो एक प्रचारक आहे. " विनायक हंसून म्हणाला.

" त्याच्या हातांतल्या पुस्तकांवरून तें मी ओळखलेंच होतें. पण मी तुला मुद्दाम विचारलें. "

" पण त्यानें पैसे आणले होते काय ? " विनायकानें प्रश्न केला.

" नाहीं. तो मदत करूं एवढें म्हणत होता. " सुंदर म्हणाला.

" बरं पण, त्यांच्याकडची मदत घ्यायला तुला कोणती हरकत आहे ?"

" वारे वा ! आपण त्यांचेच हस्तक असाल."

" तसं नव्हे. आपण त्यांचीं बाकीचीं कसलींच बोलणीं ऐकूं नयेत. पण फुकटची मदत घ्यायला हरकत कोणती ?" विनायकानें प्रश्न केला.

" अरे दुसऱ्याची मदत घेतली, कीं आपण त्याचे शरमिंदे झालों. मग त्यांनीं कोणत्याही प्रकारची घातलेली भीड मोडणें जिवावर येतें. मी उपाशीं मरेन पण त्यांची मदत घेणार नाहीं. ओहो; पण मला आतां एक गोष्ट आठवली " सुंदर टाळी मारून म्हणाला " आई, अग आई, ती नोट त्याच माणसाची असावी. आई !"

" काय रे ?" आंतून रमाबाई ह्मणाल्या.

" ती नोट त्या दिवशींच्याच माणसाची असावी. आपण त्याची मदत घेण्याचें नाकारलें, त्याच्या सर्वच गोष्टी नाकारल्या, तेव्हां आह्मांला ओशाळे करण्याकरितां तो आपल्या घरांत ती नोट टाकून गेला असावा. बस्स. हेंच खरें. आपण ती त्याला नेऊन देणार." हें सर्व बोलत बोलत तो घरांत आईपाशीं गेला होता, तो तसाच परत बाहेर येऊन विनायकास ह्मणाला—

" बस्स, विनायक उद्यां तूं माझ्याबरोबर येशील तर सांग, मी उद्यां त्या पाद्र्यांच्या कँपमध्यें येणार !"

" कशाकरितां बुवा ?" आश्चर्यानें विनूनें विचारलें.

" त्यांची ती नोट देऊन टाकणार. मला बिलकूल नको. मी तिला स्पर्श देखील करणार नाहीं. कोणत्या वाटेनें कितीसें लांब जावयाचें तें ?"

" मी तुला वाट सांगतों." विनायक म्हणाला. " अथवा उद्यां मीच तुझ्याबरोबर येईन."

" कांहीं हरकत नाहीं. तेवढें बरेंच झालें." इतक्यांत विनायक जावयास उठला. त्याबरोबर पुन्हा मागच्या बाजूस कांहीं सुरसुरल्याचा आवाज आला. विनायकास पोंचवित असतां सुंदर भिंतीच्या मागच्या बाजूस कोणीतरी पळत असल्याचीं पावलें ऐकूं आलीं. पण पहातों तर कोणीच नाहीं.

प्रकरण सहावें.

तारा तुटला !

कृष्णपक्षांतील आरंभींचीच रात्र असल्यामुळें संधिप्रकाश पडून फार वेळ झाला नाहीं तोंच चंद्रप्रकाश पडण्याचा रंग दिसूं लागला. लहान लहान पशुपक्ष्यांचीं पोरें सुद्धां आईबापांच्या भीतीनें—छे–प्रीतीनें घराकडे गेलीं. पशुपक्ष्यांच्या पोरांस आपल्या आईबापांची भीती वाटत नाहीं; त्यांचीं सर्व कामें प्रीतीनेंच चालतात. कारण तीं इतकीं आज्ञाधारक असतात कीं, जी आईबापांनीं एकवेळ त्यांस संवय लावून दिलेली असते, ती तीं सहसा सोडीत नाहींत. सर्व कामें वेळच्यावेळीं नियमित होत असतात. मग रागावून घेण्याची त्यांच्यावर पाळीच येते कशाला ? परंतु हें आपल्या पृथ्वीवरचें झालें. आकाशांत याच्या उलट प्रकार चालला होता. संध्याकाळ होऊन गेली तरी तारक–तारकांनीं आपला खेळ आटोपला नव्हता. रात्र पडण्याच्या पूर्वी त्यांच्या आईनें, पश्चिम दिशेनें, त्यांस थोड्याच वेळांत खेळ आटोपून घरांत बोलावलें होतें. पण तीं ऐकतील अशी तिची खात्री नव्हती. म्हणून घरांत कामाला जातां जातां तिनें चेहऱ्यावर राग आणून डोळे आणि मुद्रा लाल करून दटावून देखील सांगितलें. पण काय ? तिची पाठ फिरण्याचाच अवकाश होता. तारे आणि तारका यांनीं दंगा सुरू केला. तारकांनीं झिंमा-फुगडी सुरू केली. ताऱ्यांनीं आट्यापाट्या मांडल्या. झालें. लवकरच खेळ रंगांत आला. इतका, कीं त्यांना सर्वांचें विस्मरण पडून खेळांतच चित्त गुंतलें. त्यांतच भांडाभांडी, मारामारी सुरू झाली. ही दंगल आणखी अशीच कितीतरीवेळ चालली असती, पण तितक्यांत चांदोबांची स्वारी घरीं आली. वडील एकदा आलेले पाहण्याबरोबर लहान लहान तारे व तारका एका क्षणाच्या आंत घरांत जाऊन लपल्या. साधारण मोठ्या वयाचे होते ते लगेच मुद्रा पालटून व गंभीरता धारण करून जणूं काय आपण पूर्वीपासून अशाच प्रकारें उभे आहोंत असें दाखविण्याकरितां राहिले. तरी पण त्यांपैकीं ज्यांच्याकडून खरोखर अन्याय घडला होता असे कांहीं कांहीं थरथर कांपत होते. कारण त्यांचें मन खात होतें. त्यांनीं खेळाच्या भरांत कांहीं अज्ञान भावंडांस ढकलून दिल्यामुळें तीं खालीं पडलीं होतीं. एक खेळतां खेळतां धक्के खाऊन इतका जखमी झाला होता, कीं तो थोडक्याच वेळांत खालीं पडला. तो बराच चकचकीत होता. तो खालीं पडत असतां त्याच्यावर एका माणसाची नजर लागली होती.

तारा तुटून आकाशांतून खालीं अर्ध्या अंतरावर येईपर्यंत मात्र त्याला तो दिसला. पण पुढें त्याचा प्रकाशच लुप्त होऊन तो कुठल्याकुठें गडप झाला हें कांहीं त्या पहाणारास समजलें नाहीं. पण तो ज्या ठिकाणीं अंतरालांत गुप्त झाला, त्या ठिकाणावरून जर खालीं लंब काढला म्हणजे सरळ रेघ काढली तर ज्या ठिकाणीं तो अजमासें पडेल असें वाटलें त्या ठिकाणीं त्या पहाणाऱ्याची नजर गेली. खरोखरच त्याला तेथें कांहीं तरी शुभ्र पांढरें सफेत हालत आहे असें दिसलें !

तो पहाणारा माणूस घोड्याच्या गाडींतून मागच्या खिडकीवाटे तोंड बाहेर काढून हा आकाशांतला सर्व खेळ पहात होता. ही गाडी आतां चक्रनगराच्या अगदीं जवळ आली होती. इथून पुढें गेल्यावर शहराची वेस लागून तद-नंतर मिशनऱ्यांचा कँप व तेथून पुढें शहराचा बाजार लागे. गांवाच्या बाहेर सीमे-वर ही गाडी आली होती. त्या पांढऱ्या वस्तूकडे गाडींतल्या माणसानें डोळे ताणून पाहिलें. त्याला तें काय आहे हें पाहण्याची उत्सुकता उत्पन्न झाली. गाडी-वान आपला समोर वाटेकडेच पहात होता. त्याला कसलीच माहिती नव्हती. धन्यानें गाडी उभी करावयास सांगण्याबरोबर तो विस्मितच झाला. त्यानें लगेच घोड्याचा लगाम खेंचतांच गाडी उभी राहिली.

मालकानें गाडीवानास ती जागा दाखवून, पांढरें काय दिसत आहे तें बघून यावयास सांगितलें. परंतु गाडीवानाच्या मनांत उतरावयाचें नव्हतें. कारण त्यांत त्याला खरोखर मोठेंसें महत्त्व असेल असें वाटलें नव्हतें. म्हणून तो म्हणाला—

" तो आसल एकादा दगडबिगड. त्यांत बगायचं काय शेट ? "

" दगड तो ? " शेटनीं विचारिलें.

" दगड न्हाय तर खडक आसल. तो काय, तो एका टोंकाला काळा दिस-तोय आणि म्होरं पांढरा दिसतोय. कसला चमत्कारिकच दिसतोय बा, " असें म्हणून त्यानें एक जांभई दिली.

" जा. जा बरं बघून ये, जा ! "

गाडीवान चार दोन पावलं गेला नाहीं, तोंच एकदम घाबरून चार पावलें मागेंच परतला. मालक त्याच्याकडे सारखा पहातच होता. गाडीवान घाबरलेला पाहून त्यानें विचारलें—

" असं रे काय ? भ्यालास कीं काय तूं ? "

" अरेच्या ! धनीसाब त्यो दगड हालतोय की ! "

" होय का ? मग जा तर, बघून तर ये लवकर ! "

गाडीवान पुढें जाण्यास कबूल नव्हता. पण धन्याचा हुकूम त्याच्यानें मोडवेना. म्हणून तो दोन पावलें पुढें गेला. तों सुस्काऱ्याचा आवाज त्याच्या कानीं आला. त्याबरोबर तर त्याची पांचावर धारण बसली. तो तेथेंच स्तब्ध उभा राहिला.

त्याला तशा स्थितींत पाहून शेट मोठ्यानें म्हणाले—

" काय रे असा खुंटासारखा ताठ कां झालास ? "

धन्याचे हे शब्द ऐकून गाडीवान चार पांच पावलें मागें आला आणि खालीं ओणवून दगड शोधूं लागला. कारण तो ज्याला दगड ह्मणत होता त्याची अर्धी बाजू जवळच्या झुडुपांत असल्यामुळें तें खरें काय आहें हें त्या गाडीवानास बघावयास सांपडेना. भीतीनें तर त्याची गाळण उडाली होती. शिवाय शेट ओरडतच होते. ह्मणून त्यानें एक लहानसा दगड उचलला व जरा लांबच राहून तेथून हळूच त्या पांढऱ्या वस्तूवर फेंकून दिला. त्याबरोबर " आयाईग !" असा रडण्याचा लांब करुणस्वर त्याच्या कानीं आला ! शेटला देखील तो स्पष्ट ऐकूं आला ! गाडीवानाच्या तोंडचें पाणी पळालें. परंतु तो माणसाचा स्वर आहे असें समजून आल्यामुळें त्याला किंचित् धीर आला. तितक्यांतच विव्हळण्याचा व कण्हण्याचा दुसरा स्वर तेथूनच परत आला. आतां मात्र त्याची भीती साफ उडाली आणि एवढ्यांत शेटही गाडींतून खालीं उतरले. तेव्हां गाडीवानास दुप्पट धीर आला. दोघेही मिळून त्या झुडुपापाशीं गेले. लांबूनच त्यांनीं निरखून पाहिलें. त्यांनीं तें माणूसच आहे असें ओळखिलें. अधिक जवळ जाऊन पहातां तो एक सुमारें सोळा सतरा वर्षांचा मुलगा असावा असें त्यांस वाटलें. दगडाच्या परीक्षेकरितां ह्मणून मारलेल्या धोंड्याबद्दल शेट गाडीवानास रागें भरले. गाडीवानास देखील त्याबद्दल वाईट वाटलें. दोघेही जवळ गेले. त्यांनीं त्या मुलास हाक मारून एक दोन प्रश्न विचारले. पण तो उत्तरें देण्यास शुद्धीवर होता कोठें ? शेवटीं त्यांनीं त्याला चांचपून पाहिलें तों त्याच्या मस्तकांतून भळभळ रक्त आलें असून तें थोडेंसें सुकून देखील गेलें होतें. आंगावरच्या पांढऱ्या सदऱ्यावर रक्ताचे डाग पडले होते. तो मुलगा दिसण्यांत फारच सुंदर व तजेलदार असावा, पण तो बेशुद्ध पडल्यानें अगदीं सुकून म्लान होऊन गेला होता.

त्या दोघांनीं त्यास उचलून गाडींत घालण्याचा विचार केला व आसपास कोठें पाणी सांपडतें कीं काय म्हणून पाहूं लागले. परंतु रात्रीच्या वेळीं नक्की माहित असल्याशिवाय पाणी कोठून मिळणार ? त्यांनीं तसाच त्या मुलास शेवटीं गाडींत घातला व गाडी चालू केली.

मिशनऱ्यांच्या कँपवरून, चक्रपूरच्या बाजारांतून, मुख्य रस्त्यांवरून गाडी दादासाहेबांच्या बंगल्याच्या कंपाउंडांत शिरली. दादासाहेब खालीं उतरले; व एका नोकरास त्यांनीं डॉक्टरास बोलावून आणावयास सांगितलें. तोंपर्यंत त्यांनीं नेहमींचे खासगी उपाय सुरू केले, पण तो मुलगा कांहीं शुद्धीवर आला नाहीं.

इतक्यांत डॉक्टर येऊन पोंचले. डॉक्टरच्या उपायांनीं देखील तो लवकर शुद्धीवर येण्याची आशा नव्हती. शेवटीं डॉक्टरनें कसलेंसें औषध त्याच्या टाळूस लावलें आणि त्या औषधानें त्यास एका प्रहरानंतर शुद्धी येईल असें सांगितलें.

डॉक्टरच्या बरोबर हायस्कूलचे हेडमास्तरदेखील आले होते. डॉक्टरला बोलवावयास माणूस गेला तेव्हां त्यांच्याच घरीं हेडमास्तरसाहेब बसले होते. दोघेही शेजारींच अगदीं लागून असलेल्या बंगल्यांत राहत असल्यामुळें व हेड-मास्तरांची व दादासाहेबांची चांगली जानपछान असल्यामुळें इतक्या अपरात्रीं दादासाहेबांच्या घरून एकाएकीं डॉक्टरास बोलावणें कां आलें हें समजून घेण्या-करितां ते काळजी करीत डॉक्टरसाहेबांबरोबरच तांतडीनें आले होते. त्यांना प्रथम माणूस घरांतलें कोणी नव्हे हें कळण्याबरोबर जरा बरें वाटलें. पण रस्त्याच्या एका बाजूस आसन्नमरण होऊन पडलेला एक मुलगा, असें कळतांच तो कोणाचा कोण असेल हें जाणण्याची उत्सुकता त्यांस उत्पन्न झाली. म्हणून ते डाक्टरच्या व दादासाहेबांच्या परवानगीनें रोग्यास निजविलें होतें तेथें गेले.

दादासाहेबांकडे नोकरचाकरांस तोटा नव्हता. अथवा त्या मुलाच्या शुश्रू-षेकरितां आपल्या घरांतल्या माणसांपैकीं कोणास तरी त्यांनीं बसवलें असतें. परंतु त्या मुलाचीं आईबापें किंवा इतर कोणी नातलग असतील तर त्यांस कळवून, बोलावून आणण्याचा प्रश्न त्यांच्यापुढें आला होता.

मास्तरसाहेब त्या मुलास पाहण्याकरितां म्हणून आंत जाणार, तोंच त्यांस डॉक्टरनीं मध्येंच आडवून सांगितलें, कीं आणखी दोन घटकांपर्यंत तुम्ही तिकडे जाऊं नका. मग काय पहावयाचें असेल तें पहा.

मग त्यांनीं व डॉक्टरनीं मिळून खुद्द दादासाहेबांस तो मुलगा, कुठें, केव्हां, कसा, कोणत्या स्थितींत सांपडला वगैरे प्रश्न विचारले व त्यांचीं सर्व उत्तरें मिळाल्यानंतर सर्वांसच अचंबा वाटला.

त्या मुलाची दादासाहेबांकडून हकीगत ऐकिल्यानंतर मास्तरसाहेबांनीं डॉक्टरांस त्याच्याबद्दल तुम्ही काय परीक्षा केली म्हणून विचारलें. डॉक्टर म्हणाले, " तो कांहीं मरणार नाहीं. परंतु एकदा शुद्धीवर आला पाहिजे आणि लवकरच तो येईलही."

"पण त्याला झालें काय, असें बेशुद्ध व्हायला असें तुम्हाला वाटतें ?"

" त्याच्या मेंदूस भयंकर दुखापत झाली आहे आणि त्यांतही दुखापत झाल्यानंतर तो किंचित् शुद्धीवर आला असेल, तेव्हां देखील कांहीं मानसिक दुःखाचा परिणामही त्यांत बराच झालेला आहे. पुन्हा जेव्हां तो शुद्धीवर आला असेल–आला असलाच पाहिजे–त्या वेळीं देखील त्याच्यावर दुसरा आघात पूर्वस्थळींच म्हणजे मेंदूवर झाला आहे. तो शारीरिक असून मानसिकही असेल."

दादासाहेबांना ही डॉक्टरची चिकित्सा ऐकल्याबरोबर गाडीवानानें मारलेल्या दगडाची आठवण झाली. तो दगड देखील त्याच्या मस्तकावरच बसला असला पाहिजे, अशी त्यांची खात्री झाली व त्यांच्या तोंडून "अरेरे ! चूचूच् !" असे उद्गार बाहेर पडले.

" पण त्या मुलाला ही जखम तरी कशी झाली असेल ?" मास्तरसाहेब विचारपूर्वक म्हणाले.

"त्याच्या मस्तकावर दगडाचा अगर कशाचा तरी जबरदस्त आघात झाला आहे. त्याला थोडासा मारही मिळाला असेल असें देखील वाटतें."

इतक्यांत " आई–आई ग" असे लांब दुःखपूर्ण स्वरांत निघालेले शब्द त्यांनीं ऐकले. त्या बरोबर डॉक्टर नको म्हणत असतांही मास्तर साहेब " मी नुसता बघून येतों." असें म्हणून आंत घुसले.

मास्तरसाहेब लांबूनच पाहूं लागले. पण त्यांस कांहीं ओळखतां येईना. म्हणून ते आणखी जवळ गेले तरीही त्यांस चांगलेंसें ओळखतां येईना. कारण अगोदरच क्षीणतेनें त्याच्यांत फरक पडलेला, तशांत रक्तबंबाळ कपड्याचा पोषाख आणि त्यांतही निरनिराळ्या घरगुती व डॉक्टरी औषधांचा लेप चेहऱ्यावर अस-

त्यामुळें मास्तरना बरेंच जवळ जाऊन डोळे ताणावे लागले. मास्तरनीं त्यास पाहिलें आणि एकदम त्यांची मुद्रा पालटली.

"अरे! हा तर सुंदर!" हेडमास्तरसाहेब एकदम आश्चर्यातिशयानें मोठ्यानें ओरडले!

"सुंदर! सुंदर कोण? तुमच्या ओळखीचा आहे कीं काय?" मास्तर साहेबांची तारांबळ झालेली पाहून दादासाहेब आंत येऊन म्हणाले.

"तोच हा सालस व प्रामाणिक मुलगा! खराच दुर्दैवी. ज्याच्याबद्दल मी तुमच्याकडे दोन तीनदां बोललों आणि शिफारस केली होती, तोच हा हतभागी सुंदर!"

"अरेरे! बिचारा. मी उगीच टाळाटाळ केली. परंतु त्यालाही कारण अण्णासाहेबच झाले. पण याच्याबद्दल तुमची देखील खात्री आहेच. अण्णासाहेबांनीं देखील त्याची माझ्याकडे अनेकवार तारीफ केली होती. तो बरा होतांच मी त्याला आमचेचकडे ठेवितों. पण तो एकवार बरा झाला पाहिजे. त्याची आई आहे, नव्हे!"

"ओहो! माझ्या ध्यानांतच नाहीं." मास्तरसाहेब म्हणाले, "तिला बोलावणें पाठविलें पाहिजे. पण आतां बोलवावें कीं सकाळीं. गरीब बिचारी! ती घरीं आपल्या मुलाची वाट पहात बसली असेल? आतां ही बातमी ऐकून ती शोकानें आकाशपाताळ एक करील! काय करावें?"

"मला वाटतें तिला बोलावूं नये." दादासाहेब ह्मणाले. "कारण मायेचें माणूस आजारी माणसाजवळ असलें पाहिजे हें खरें, पण अशा स्थितींत असून उपयोगी नाहीं."

"छे छे, तिला आतांच बोलावणें पाठवा!" हेडमास्तर ह्मणाले. "डाक्टरनीं सांगितलेलें तुह्मीं ऐकलें असेलच, कीं मानसिक यातनांचा देखील त्याच्या मेंदूवर परिणाम झाला आहे ह्मणून. शुद्धीवर येतांच जर त्याची आई त्याच्या दृष्टीस पडली, तर त्यास बरेंच समाधान वाटून तो लवकर बरा होईल."

दादासाहेबांस हें त्यांचें ह्मणणें पटलें व त्यांनीं रमाबाईना बोलावणें पाठविलें.

डाक्टर पूर्वींच निघून गेले होते. मास्तरसाहेब देखील जाणार होते, परंतु रमाबाईची व दादासाहेबांची ओळख नव्हती. मास्तरसाहेबांची ओळख तरी सुंदरवरूनच थोडीशी होती. ह्मणून तिचें समाधान करावयास ते तेथेंच राहिले.

थोड्याच वेळानें चुकलेल्या पाडसाची आई हंबरडा फोडीत जशी धांवते तशा रमाबाई कावऱ्याबावऱ्या मुद्रेनें धांवत आल्या. त्या थेट सुंदर होता तेथें घुसल्या आणि "हाय रे माझ्या बाळा !" म्हणून त्यांनीं हंबरडा फोडला ! तिच्या जीवनाचा आधार, तिचा आनंदाचा तारा तुटल्यासारखा तिला वाटला.

प्रकरण सातवें.

आश्रय मिळाला.

"कायरे ए ! कुठें चाललास इतक्या घाईनें !" डोळे मिचकावीत हरी म्हणाला.

"खबरदार ! मी घाईंत आहें, माझ्याशीं अदबीनें बोल. कारण मी पहिल्या नंबराचा मित्र आहें." कुचेष्टेनें डोळे मारीत व पुढें चाललेल्या विनायकाचें शक्य तितकें अनुकरण करीत, गणू ह्मणाला.

"अरे जा ! पहिल्या नंबराचा मित्र असलास तर वार मागायला जाशील, हुषार असलास तर पुस्तकांची भीक मागशील, बक्षिसें पटकावणाऱ्याचा दोस्त असलास तर गणूचे हातरुमाल धुशील; पण जरा उभा रहा ना !"

"छे रे बुवा. एवढ्यानेंच कांहीं माझें संपलें नाहीं. मला मिशनऱ्यांची मदत आहे. मी मिशनऱ्यांचीं पुस्तकें विकावयास मदत करतों; अर्थात् मी धर्मप्रसारक आहें. मॅजिकूलँटर्नच्या वेळीं मी आकाशांतल्या देवबापाचीं गाणीं म्हणतों. माझ्या सुंदर आवाजाचा मी योग्य उपयोग करतों असें यावरून नाहीं तुला वाटत ? चावट कुठला; खबरदार, पुन्हा मला हाक मारशील तर !"

"अरे पण उभा रहा. विनायक–ओ नव्हे–नव्हे–चुकलों–चुकलों उभा रहा. जरा सावकाश चाल, गणू मी पण येतों ना ? हः हः हः" हरीनें मुद्दाम 'विनायक' ह्मणून नंतर 'गणपत' या शब्दांनीं चुकीची दुरुस्ती केली. पण त्यानें ज्याकरितां तसें मुद्दाम केलें होतें तो परिणाम घडून आलाच. म्हणजे आपल्यामागें ही दुष्टांची जोडी लागलेली आहे हें जाणून मागें न पाहतां अथवा चकार शब्द न उच्चारतां झपाझप चालणारा विनायक आपल्या नांवाची हांक ऐकून एकदा फिरला आणि त्यानें मागें पाहिलें, व परत चटकन् त्यानें मान फिरविली. परंतु तेवढ्यालाच गणू व हरी दोघेही हंसले.

" पण कायरे ए, पॉटरः हल्लीं भांडींबिंडीं कांहीं बनवितोस कीं नाहीं ? " हरीनें विचारलें. विनायक एक तरी उत्तर देईल अशी त्याची अपेक्षा होती.

" छे रे ! मी सातव्या इयत्तेंत असतों. मी आतां लवकरच मॅट्रिक झाल्यावर रेवरंड बनून धर्मप्रसार करणार ! पण मी आतां रागानें मागें पाहिलें तरी तुला माझी भीति नाहीं वाटली ? फारच चमत्कारिक आहेस तूं ! " गणू उपरोधिक स्वरानें ह्मणाला.

" वाटली तर, वाटली तर. तुझ्या मागें बघण्याची नाहीं, तर तुझ्या धरसोडेपणाची. वडवाघळाची जी गत झाली तीच तुझी होईल हें पक्कें ध्यानांत ठेव. आश्रय ज्याचा घ्यावयाचा तो तरी चांगला बळकट असावा लागतो. भिकारड्या सुंदरला जाऊन मिळण्यांत भलेपणा केल्यासारखा वाटत असेल, पण सुंदरबरोबर त्याच्या वांटयाचाही भागीदार होण्याची पाळी येईल तेव्हां डोळ्यांतून टिपें पडतील. टिपें बरं ! " इतक्यांत विनायक सुटतोसा वाटल्यावरून त्याचा पाठलाग करण्यास हरीनें गणूस इशारत दिली.

गणू विनायकास जाऊन धरणार, तोंच अण्णासाहेब घाईघाईनें कोठें तरी जात असलेले त्याच्या नजरेस पडले. गणू चपापून तेथेंच थांबला; व त्यानें मागें पाहिलें, तेव्हां हरीनें त्यास मागें परतण्याची खूण करून आपण मागच्यामागेंच पळाला.

" सुटला गुलाम, अगदीं आयत्या वेळेस सुटला. बरं सांपडेल परत. जातो कोठें ? " गणू म्हणाला.

" कां ? आतां तो लवकरच जाणार ना मिशनऱ्यांबरोबर ?" हरीनें विचारलें.

" जाईना का. एक पीडा गेली ! " गणूनें उत्तर दिलें.

" आणि असला म्हणून आमचा काय तोटा होतो आहे. तो सुटला आमच्या गोटांतून तर दामू पक्का सांपडला आहे. बाकी दाभूनें आपली कामगिरी उत्तम प्रकारें करवून घेतली नाहीं ?" हरीनें प्रश्न केला.

" अगदीं सोळा आणे. पण तो देखील आला नसेल ना ? "

" मला मघांच वाटेवर येतांना भेटला होता. तो आज इकडे येणार नाहीं. गोविंद देखील आला असेल. चल बघूं लवकर घराकडे."

थोडक्याच वेळांत ते हरीच्या घरीं येऊन पोंचले. गोविंद त्यांचीच वाट पहात होता. हरीनें घडलेली सर्व हकीगत सांगितली.

" मग सुटला तावडींतून म्हणतां ?" गोविंदानें विचारलें.

" हो सध्या पुरता तरी सुटला खरा बुवा !" गणू म्हणाला.

" बाकी लवकरच तो मिशनऱ्यांबरोबर निघून जाणार आहे, एवढें मात्र अगदीं ठरलें आहे." हरी ह्मणाला.

" कशावरून ?" गोविंदानें विचारलें.

" तें आह्मी सर्व ऐकलें. आह्मांला कळलेल्या बातमींत शंका घ्यावयासच नको." हरीनें उत्तर केलें.

" आणि तिकडची काय हकीगत ?" गोविंदानें विचारलें.

" तिकडची ना ? तिकडची काय असणार ? तो सुंभ्या शुद्धीवर आल्यानंतर त्यानें हकीगत सांगितली." हरी म्हणाला.

हरीच्या तोंडचे हे शब्द ऐकण्याबरोबर गोविंदाशिवाय बाकीच्यांचे चेहरे काळवंडले !

" त्याला ठाऊक असलेलीच त्यानें सांगितली ना ?" गोविंदानें खुबीनेंच विचारलें.

" तीच सांगणार—नाहींतर ठाऊक नसलेली कुठून सांगेल, पण तेवढ्यानें सुद्धां कांहीं कमी परिणाम होणार नाहीं." हरी हंसून ह्मणाला.

" बरं आतां पुढें ?"

" पुढें काय ? विनायक मिशनऱ्यांबरोबर जाईल तेवढें आपल्या पथ्यावरच पडणार आहे. कसें तें तुमच्या लक्षांत आलेंच असेल !" आपल्याकडे तोंडें पसरून पहाणाऱ्या सर्वांस गोविंदानें सुचविलें.

" बरोबर-बरोबर-अगदीं बरोबर" गणू म्हणाला, आणि आतां त्याला आम्ही इतका सतावून सोडला आहे, कीं लवकरच तो हें चक्रपूर सोडून निघून जाईल. बाकी आज मात्र त्याची पुरी कंबक्ती भरलीच होती."

"पण कसला निगरगट्ट तो" मध्येंच हरी ह्मणाला, " कांहीं केल्या चिडीस जाईनाच. एक शब्द बोलता, कीं त्याला बोलण्यांत गुंतवून भांडणापर्यंत कसल्याही कुरापतीनें पाळी आणून चांगलाच मऊ केला असता. पण सुटला. "

"सुटला कसचा ? अण्णासाहेब मध्येंच कुठून उत्पन्न झाले ! दर खेपेस, अण्णा कुठून बुवा उत्पन्न होतात कांहीं कळत नाहीं. ऐन रंगांत आलेलें काम

ह्यांच्या मध्येंच येण्यानें नाहींसें होतें. बाकी एका धोंड्यानें दोन पक्षी पडले !" गणू ह्मणाला.

"मी सांगूं ? आतां बहुतेक गोविंदाला आमच्या अण्णांतर्फे दादासाहेबांकडे नोकरी मिळण्याचा बराच संभव आहे. सुंदरयाला त्यांनीं ठेवला अथवा न ठेवला तरी गोविंदाला तेथें नक्की रहायला मिळेल. आणि गोविंदराव तुह्मांला तेथें राहण्याचा योग आला, तर सोडूं नका. मग नाईट हायस्कूलला जाऊन अभ्यास करण्याची पाळी आली तरी हरकत नाहीं." हरी बोलला.

"बरं आहे. मी नाहीं म्हणतों कशाला ? मला उलटा फायदाच आहे या गोष्टीचा. बाकी हायस्कूलांची धरसोड केल्यानें अभ्यासांत व्यत्यय येतो." गोविंद विचारपूर्वक ह्मणाला.

"पण तुमच्या सारख्या हुषार मुलांस कसला व्यत्यय ? व्यत्यय येतो आमच्या सारख्यांला ! शिवाय नाइट स्कूल तरी चालवलें आहे सर्व आपल्या मास्तरनीं. इकडे आणि तिकडे कांहीं तरी फरक आहे का ?"

"होय, येवढें मात्र खरें." गोविंद ह्मणाला.

"आणि शिवाय सुंदर जर दादासाहेबांकडे राहिला तर तो बहुधा जाणार नाइट हायस्कूल मध्येंच. तेव्हां त्याच्यावर नजर ठेवण्यास कोणीतरी पाहिजेच." हरी म्हणाला.

इकडे विनायक आणि अण्णासाहेब भेटले ह्मणून सांगितलेंच आहे. अण्णांनीं विनायकास विचारलें--

"काय विनू ? कुठें चालला आहेस तूं ? सुंदरकडे काय ?"

"छे ! सुंदरकडून मी मघां जाऊन आलों. मी त्याला शेवटचा अंहं—भेटण्याकरितां म्हणून गेलों होतों, परंतु त्याची भेट झाली नाहीं. त्याला किंचित् झोंप लागली होती. पण मात्र आतां तो लवकरच बरा होईल असें दिसतें. नाहीं तर त्याचें वर्ष फुकट गेलें असतें." विनायक ह्मणाला.

"तुझा अभ्यास कसा काय चालला आहे ?" अण्णांनीं प्रश्न केला.

"माझा अभ्यास, माझ्याचसारखा—बरं आतां जातों मी—तुम्ही दादासाहेबांकडे जात आहां वाटतं ?" विनायकानें घरीं जातां जातां ह्मटलें.

विनायक आपल्या वाटेनें गेला. अण्णासाहेब दादासाहेबांच्या बंगल्याकडे वळले. विनायकासंबंधींच विचार त्यांचे मनांत घोळत होते. अशा असहाय, गरीब मुलांचा उपयोग परधर्मी लोक करून घेतात आणि आपण मात्र त्यांच्याकडे दुर्लक्ष करितों. दिवसेंदिवस असल्या गरीब पोरांचा भरणा किती तरी वाढत चालला आहे. त्यांच्या संरक्षणार्थ आपल्या शहरापुरता तरी कांहीं उपाय करणें जरूरीचें आहे, असें त्यांना वाटलें. विनायकावरून त्यांना सुंदरची आठवण झाली. सुंदर किती हुषार मुलगा ! किती पाणीदार आणि तेजस्वी, पण त्याच्या नशिबीं गरिबी ! बरं त्याला मदत करण्याकरितां झणून आरंभ केला आणि ती पुरी केलीही असती पण त्याचें शील कचें ! खरोखर इतका सर्व गुणांनीं संपन्न मुलगा इतका कच्या दिलाचा निपजावा हें आश्चर्यच नव्हे काय ? मीं जो प्रयोग केला, तो केला नसता तर त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल मला शंका सुद्धां आली नसती आणि अझून येतही नाहीं. पण प्रत्यक्ष अनुभवापुढें शंकेची काय जरूरी आहे ?

विनायक आणि सुंदर ह्या दोन मुलांच्या मूर्ती त्यांच्या डोळ्यांपुढून गेल्यानंतर त्यांस गोविंदाचें स्मरण झालें.

गोविंद मात्र सर्वथैव चांगला मुलगा; तो सुंदर इतका देखणा नाहीं, सुंदर इतकाच हुषार नसेल, सुंदर इतका तेजस्वी नसेल. सुंदरसारखा लोकांच्या मनांत कींव उत्पन्न होण्याइतका दरिद्रीही नसेल. पण प्रामाणिक आहे. सज्जन आहे. धिम्या स्वभावाचा आहे आणि एकंदर स्थिति पाहतां गरीबही पण आहे. अशा मुलांना उत्तेजन देणें जरूर आहे !

अशा प्रकारचे विचार अण्णासाहेबांच्या मनांत घोळत असतांच ते दादासाहेबांच्या बंगल्यावर येऊन पोंहचले.

दादासाहेब हे चक्रपूरचे एक धनाढ्य सावकार होते. त्यांनीं पुष्कळ पैसे खर्चून इलेक्ट्रिसिटीच्या जोरावर दोनतीन कारखाने चालविले होते. परदेशी मालाच्या तोडीचा माल आपल्या देखील देशांत उत्पन्न होतो. हें त्यांनीं चांगलेंच लोकांच्या प्रत्ययास आणून दिलें. कांच, लोखंड व पितळ यांच्यापासून हर तऱ्हेचा माल तयार करण्याचे त्यांचे कारखाने होते. त्यांच्या कारखान्यांतून तयार झालेल्या मालाची सर्वत्र वाहवा होऊन बाजार पेठांत त्याला परदेशीच्या बरोबरीचा किंबहुना जास्तच मान मिळूं लागला. इतर व्यापाऱ्यांसारखी केवळ परदेशी मालाची

दलाली करून, स्वतःच श्रीमंत होऊन व लोकांचा पैसा परदेशांत घालवून अप्रत्यक्षपणें त्यांस दरिद्री करण्याचा प्रयत्न दादासाहेबांनीं केला नाहीं.

अण्णासाहेब हे नुसते परफ्यूमर होते. निरनिराळ्या प्रकारचीं अत्तरें व सेंट तयार करण्याच्या त्यांनीं डिस्टिलरी स्थापन केल्या होत्या व या धंद्यांत त्यांचाही फारच चांगला जम बसला होता.

अण्णासाहेब दादासाहेबांकडे जाऊन पोंचल्यानंतर त्यांच्या धंद्याच्या वगैरे कामकाजाच्या गोष्टी झाल्यावर सुंदरच्या प्रकृतीबद्दल गोष्ट निघाली. सुंदर आतां सुधारत असून त्याला लवकरच आराम वाटेल. त्याला व त्याच्या आईला रहाण्याकरितां म्हणून दिलेल्या लहानशा घरांत तो रहावयास गेल्याचें अण्णासाहेबांस कळलें.

" त्याला झालेल्या दुखापतीचें कारण व त्याचा एकंदर छडा लागला काय?" अण्णासाहेबांनीं विचारलें.

" त्यानें स्वतःच सावध झाल्यावर कांहीं सांगितलें, तें मी तुम्हांला सांगितलेंच आहे. त्याच्याहून जास्त कांहींच कळत नाहीं. तपास केला पाहिजे. त्याच्या हकीगतीवरून मला साधारण दामूचा संशय येतो. एरवीं सुंदरसारखा सुशील मुलगा क्वचितच सांपडेल. "

अण्णासाहेब कांहींच बोलले नाहींत, पण किंचित् हांसले.

" कां हांसलांत ? तुम्ही परीक्षा काय ठरविलीत असेल ती असो. त्याच्या हेडमास्तरचें मत माझ्यासारखेंच आहे, आणि मलाही पण तसेंच वाटतें. श्रीमंतांचीं मुलें बहुतकरून, आमच्यासारख्या धंदेवाल्यांना जशा प्रकारच्या तरुणांची गरज असते तशीं निपजत नाहींत. ह्या सुंदरला जर मदत केली तर परदेशी कलाकौशल्यांची, धंद्याची व कारखान्यांची माहिती मिळवून धंदे शिक्षण घेण्यास जे श्रम, जें धैर्य व चिकाटी, जी कर्तव्यतत्परता व जी कळकळ लागते ती त्याच्यांत बीजरूपानें वास करीत असलेली दिसते आहे. सचोटी हें तर व्यापारधंद्याचें बीज. मला ह्या मुलाच्या ठिकाणीं हे सर्व गुण एकवटलेले दिसतात. शिवाय तो मुलगा बुद्धिवान व भाग्यवान् निपजावा असें त्याच्या चर्येवरूनच मला वाटतें. कां तें समजत नाहीं. मी ज्योतिषीही नाहीं. परंतु अंतःप्रवृत्ति म्हणून जी कांहीं असते तिच्या कलाला कारणें देतां येणार नाहींत. त्याच्या शिक्षणास मदत करून त्याला

कारखान्यांत एव्हांपासूनच घ्यावा असें मला वाटूं लागलें आहे. तुमचें काय म्हणणें आहे यावर ?" दादासाहेब ह्मणाले.

"खरोखर विचाराल तर, माझ्या मतें अशा प्रकारच्या उत्तेजनास सुंदरपेक्षां गोविंदच अधिक पात्र आहे. पूर्वी मी तुह्मांस एक दोन वेळ असें सांगितलेंही आहे. तुमचा उद्देश अत्यंत स्तुत्य, अनुकरणीय आणि अभिनंदनीय आहे. देशांतल्या तरुणांस; गरीब, निराश्रित, परंतु हुषार, बुद्धिमान् व होतकरू मुलांस; प्रथमपासूनच आपल्या देखरेखीखालीं-हाताखालीं शिक्षण देऊन, त्यांचा कल व बुद्धि ओळखून त्यांस धंदेशिक्षणांत तयार करणें हें तुमच्यासारख्या धनिक व्यापाऱ्यांचें कर्तव्य आहे. पण ते फारच थोडें ओळखूं शकतात. इतकेंच नव्हे तर निराश्रित व गरीब होतकरू मुलांचे शिक्षणाच्या मदतीकरितां ह्मणून एकादा सार्वजनिक फंड उभारला जावा अशी माझी फार दिवसांपासूनची कल्पना आहे, आणि तिला आतां मूर्त स्वरूप देण्याचे दिवस अगदीं जवळ येत चालले आहेत. कारण परधर्मीयांनीं भोळ्याभाबड्या बायांस व त्यांच्या मुलांस भुरळ देऊन बाटवून टाकण्याचा सपाटा चालवला आहे. अशा वेळीं त्यांच्या प्रतिकारार्थ ह्मणून आपल्या शहरापुरता तरी आपणांस कांहीं उपाय योजावयास नको काय ? आतां सुंदर व गोविंद यांविषयीं जें मी तुह्मांला सांगितलें, त्याबद्दल यापेक्षां जास्त कांहीं सांगत नाहीं. पण जशी तुमची मनःप्रवृत्ति, तशी माझी असेंच कां ह्मणाना ? मला सुंदरपेक्षां गोविंद, बाकीच्या नाहीं तरी एकाच गोष्टींत श्रेष्ठ वाटतो आणि तो प्रामाणिकपणा. मग तुह्मी त्याला शील ह्मणा किंवा इतर कांहीं ह्मणा." अण्णासाहेबांनीं उत्तर दिलें.

"कशावरून तुह्मी असें ह्मणतां ?" दादासाहेबांनीं विचारलें.

"कशावरून तें मी आतांच नाहीं सांगत. कदाचित् सुंदरपेक्षां गोविंद अधिक प्रामाणिक आहे असें मी सांगूं शकणार नाहीं. पण सुंदर दिसतो तितका सात्विक आणि प्रामाणिक नसावा, असा मला संशय येतो व तो खराही ठरेल-ठरलाच आहे बहुतेक. बाकी तोही चांगला असून आश्रयास पात्र आहे, असें मी तुह्मांला पूर्वीपासूनच सांगत आलों आहे. पण सवड असल्यास गोविंदाची व्यवस्था अगोदर करून जमली तर मग सुंदरचीही करावी." अण्णासाहेब म्हणाले.

"गोविंद देखील चांगला आहे, असें हेडमास्तरनीं मला सांगितलें आहे. बरं. दोघांचीही तजवीज करूं. पण सुंदरला तुम्ही अप्रामाणिक कसा व कां ठरवतां, तें तरी कळूं द्या. मला तुमच्या या बोलण्यांत कांहीं तथ्य दिसत नाहीं."

"राहिलें तर आमचें" अण्णासाहेब इतकें बोलून उठले.

प्रकरण आठवें.

नवा डाव.

“ मग आपली नेमणूक झाली म्हणतां, कॉरेस्पॉंडंद् क्लार्कच्या जागेवर ? ” हरीभाऊ म्हणाले.

“ होय, सध्या तरी तिथें बसतों खरा ! ” गोविंदानें उत्तर दिलें.

“ आणि सुंद्र्या कॅशडिपार्टमेंटमध्यें ना ? ” गणपतनें विचारलें.

“ तुम्हाला ठाऊक असतां पुनः पुन्हा मला तीच तीच गोष्ट कशाला बुवा विचारतां ? ” गोविंदानें त्रासून उत्तर दिलें.

“ वाः ! आपण अगदीं आतां इतके तयार झालां वाटतं ?” गणबा म्हणाले.

बाकी नाईटस्कूलमध्यें आतां तुह्मीं अगदीं दोस्त बनलां असाल ! ” हरीनें गोविंदाला खिजविण्याकरितां मुद्दाम म्हटलें.

“ बाबा ! कृपा करा. हा विषयच बदला. कांहीं तरी पुढचा बेत ठरवणार असलां तर ती गोष्ट बोला. त्याची आणि माझी आतां अगदीं जन्माची दोस्ती बनली आहे. ती कधींच तुटणार नाहीं. दोघांतला एक कोणी तरी नाहींसा होईल तेव्हांच ती तुटेल. ” गोविंद म्हणाला.

“ पारा खूप चढला आहे बुवा ! ” गणू हरीला म्हणाला.

“ एकंदरींत ठीक आहे. कॅशकडचा हेडक्लार्क कसा काय आहे ? ” हरीनें चौकसपणानें विचारलें.

“ फारच भला माणूस. पण त्याची आणि त्याची जिगर दोस्ती ! ”

“ त्याची आणि कोणाची ? ” मुद्दामच गणूनें विचारलें.

“त्याची आणि त्या सुंद्र्याची. मला त्याचं दर्शन देखील घ्यावंसं वाटत नाहीं. प्रत्येक बाबतींत तो माझ्या आड येऊं लागला आहे. आजपर्यंत माझा, त्याच्या-विषयींचा राग कांहीं तरी प्रमाणांत होता. कारण शाळेंतल्या अभ्यासांतच तो वर होता. पण आतां आयुष्यभर जेथें नोकरी करून नांव व पैसा मिळवा-वयाचा; तेथें देखील मला हाच सामनेवाला माझ्या समोर आड येऊन माझें तेजच पडूं देत नाहीं. म्हणजे हा आतां माझ्या जन्मासच पुरल्यासारखा झाला.